# प्रकरण तिसरे

# 'आता होऊन जाऊ द्या !' मधील दलित कवितेतील विशेष

## प्रकरण तिसरे

## 'आता होऊन जाऊ द्या !' मधील दलित कवितेतील विशेष

बहुतांश दलित लेखकांनी आपल्या भावअभिव्यक्तीसाठी कवितेचे माध्यम स्वीकारले आहे. दलित साहित्य आणि कविता यांची निर्मिती प्रेरणा ही आंबेडकरांचे विचार आणि कार्य म्हणजेच चळवळ आहे हे आपण पाहिले.

काव्य हा प्रकार गाण्याला जवळचा आहे. कमी शब्दात भरपूर आशय व्यक्त करण्याचे सामर्थ्य कवितेत आहे. त्यामुळे आंबेडकरांच्या विचारमंत्राने आणि चळवळीने जागृत झालेला दलित समाज आपल्या व्यथावेदना, अन्याय, अत्याचार कवितेतून मांडु लागला. साहजिकच प्रारंभीची दलित कविता वेदना, नकार, विद्रोह अभिव्यक्त करणारी, समाजाला अन्यायाविरूध्द लढण्याची प्रेरणा देणारी जागृती निर्माण करणारी आहे. दलित कविता हे अनुभव मांडुन प्रस्थापित व्यवस्थेविरूध्द लढण्याचे अस्त्र आहे. असाच प्रयत्न सध्याच्या काळातील कवी लोकनाथ यशवंत यांनी आपल्या कवितेतून केलेला दिसतो.

कवी लोकनाथ यशवंत हे या शतकाच्या शेवटच्या दशकातील महत्त्वाचे कवी आहेत. पहिल्या दोन पिढीपेक्षा या तिसऱ्या पिढीची कविता थोडीशी निराळी आहे. प्रशासकीय सेवेत कार्यरत असणाऱ्या लोकनाथ यशवंताचा 'आता होऊन जाऊ द्या !' हा पहिला काव्यसंग्रह १ जाने १९८९ ला प्रकाशित आला. या काळातच दलित कवितेला साचलेपणाआला असल्याची ओरड वाङ्मयाच्या क्षेत्रात सुरू झाली होती. 'दलित कवितेचा थांबलेपणा' सारखे लेख लिहिले गेले. व्यासपीठावरून चर्चासत्रे, परिसंवाद होऊ लागले या पार्श्वभूमीवर संघर्षाचे स्पष्ट आव्हान शीर्षकातच देणाऱ्या लोकनाथांच्या कवितेचे मोठेच स्वागत झाले.

प्रस्तुत काव्यसंग्रहाला अस्मितादर्श वाङ्मय पुरस्कार, दमाणी साहित्य पुरस्कार, डॉ. आंबेडकर शताब्दी गौरव पुरस्कार मुक्तीबोध कवितासंग्रह पुरस्कार, राज्य पुरस्कार आणि कवयित्री संजीवनी खोजे पुरस्कार असे सहा सन्मान मिळाले इंग्रजी व उर्दू भाषेत अनुवाद देखील झाले अशी ही कवीच्या आत्मपीडेतून आणि आत्मशोधातून जन्मलेली वेगळया

प्रकारची कविता आहे. 'आता होऊन जाऊ द्या !' या काव्यसंग्रहातील कवितांचा अभ्यास विवेचनाच्या सोयीसांठी आशयसूत्रानुसार कवितांची स्थुलमानाने विभागणी करून मांडलेला आहे. अर्थात काही कविता अनेकार्थी असून काहींना दुहेरी तिहेरी संदर्भही आहेत विवेचनात त्यांचे ही उल्लेख केले आहेत.

## ३.१ सामाजिक परिवर्तन आणि मूलतत्त्ववादी प्रवृत्तीचे कावेबाज रूप :

देशाला स्वातंत्र्य मिळून पन्नास वर्षे झाली तरीही समाजव्यवस्था फारशी बदलली नाही. सामाजिक आर्थिक, धार्मिक समता आलेली नाही. तेव्हा स्वत:ला अंतर्मुख करून आपण विचारपुर्वक लढले पाहिजे असे कवीला वाटते. स्वातंत्र्यानंतर जे सामाजिक अभिसरण अपेक्षित होते ते घडलेच नाही हे कटु वास्तव कवीच्या अनुभवाला येते. सामाजिक बांधिलकीच्या शोकांतिकाच सर्वत्र पहावयास मिळतात असे तो 'कथा' या कवितेत सांगतो. ''इतिहासाच्या पार्श्वभूमीवर समकालीन जीवनाचा आविष्कार करणे, आत्मशोध घेणे हे तिसऱ्या पिढीच्या दलित कवितेचे वेगळेपण आहे''[१] असे महेंद्र भवरे म्हणतात. याचा प्रत्यय कवी लोकनाथ यशवंताच्या कवितेत येतो.

या देशात मूलतत्त्ववादी प्रवृत्तींनी आपली मुळे भक्कम केली आहेत. सामाजिक अभिसरणाच्या नावाखाली अनेक युक्त्या प्रयुक्त्या वापरल्या जात आहेत. हे सामाजिक वास्तव कवीच्या मनाने टिपले आहे. म्हणूनच संस्कृतीच्या नावाखाली जात-पात-धर्म जपणाऱ्या प्रवृत्तीबद्दलचा संताप कवी उपरोधिक शैलीत व्यक्त करतात. आपल्याला कुष्ठरोग्यासारखे गावापासून-समाजापासून दूर रहावे लागले. गाव कधी नव्हतेच आपले तरी मनात प्रश्न उमटतोच.

''गावात दगडांचे देव आणि दगडाचीच देवालयं
तू आणि मी हाडामासांचे गावाबाहेर कसे ?''[२]
('लेप्रसी' पृष्ठ क्र.२२)

या समाजव्यवस्थेत माणसांना माणसाबरोबर राहू दिले जात नाही. माणसासारखी वागणूक मिळत नाही. त्यामुळे मनुष्यत्वाचे मोल न जाणणाऱ्या संस्कृतीबद्दल कवीला घृणा वाटते.

आंबेडकरांच्या काळात समाजाला चेतना जागृती देण्याचे कार्य अंधार पडल्यावर रात्री केले जायचे. अगदी गुपचुपपणे उठाव, विरोधाबद्दल सांगितले जायचे. कसलाही गाजावाजा आला नाही तरी सकाळी परिणाम मात्र नक्की दिसायचा. पण आज परिस्थिति बदललीय.

''लोक समोरच्यांच्या डोळयात डोळे घालूनच
पुढचं बोलतात''[३]

('जागृती' पृष्ठ क्र. १९)

बाहय परिस्थितीचे,माणसांच्या प्रवृत्तीचे, जागृतीचे हे बदलेले रूप लक्षात घेता आपणही आता आत्मशोध घेतला पाहिजे असे कवीला वाटते. सामाजिक वास्तवाच्या पार्श्वभूमीवर आत्मभानाच्या जागृतीची गरज कवी सांगतात.

बदलत्या सामाजिक परिस्थितीतील, अस्पृश्यतेचा वेगळा आणि थरारक अनुभव कवीने 'भीमराव मेश्रामची कविता' मध्ये प्रत्ययकारी स्वरूपात मांडला आहे. भीमराव मेश्राम आणि संध्या देशपांडे यांची काशीला इंटरव्हयुसाठी जाताना ओळख होते. ती त्याचा हात दाबेत पुढे ओळख वाढून मैत्री होते. भौतिक सुखाच्या हरेक क्षणावर स्वार होऊन संध्या देशपांडे मेश्रामला वश करण्याच्या प्रयत्न करते. नामांतराचा लढा चालू असताना घोषणा देणाऱ्या मेश्रामाचे ती उत्स्फुतपणे चुंबन घेते. तिच्या कौतुकाने तो सुखावतो. परंतु त्याने पाणी मागितल्यावर वेगळया ग्लासमध्ये पाणी देऊन लगेच ग्लास धुवायला टाकते. तो निघतो तेव्हा स्वत:च्या ओठावरून जीभ फिरवते जणू तेही स्वच्छ करते.

''धुवायला टाकलेल्या काचेच्या ग्लासचं
व तिच्या जीभ फिरविणाऱ्या ओठाचं
कोडं मला आतापर्यंत उलगडलेलं नाही''[४]

('भीमराव मेश्रामची कविता' पृष्ठ क्र. ७०)

असं मेश्राम म्हणतो. दोन भिन्न संस्कृतीमधला झगडा उलगडणारा नाहीच देशपांडेच्या जगाचं खर रूप तेच आहे. कायद्याने जरी अस्पृश्यता गेली असली तरी मनातून गेली नसल्याने अशी टिकवली जाते. अलिकडच्या सवर्णांना क्रांतिकारी मित्र चालतो पण त्याची जात चालत नाही. मेश्रामचे घोषणा देणारे ओठ ती चुंबनाच्या निमित्ताने बंद करते त्याचा आवाज रोखते. हेच मूलतत्त्ववादी प्रवृत्तीचं कावेबाज रूप आहे असं कवी सुचवतात.

परंपरागत संस्कृतीचा समाज व्यवस्थापनाचा कावेबाजपणा कळल्यामुळे संताप अनावर झाला तरी आत्मशोध घेणाऱ्या कवीच्या मनावर आंबेडकरी ज्ञानशक्तीचे सामर्थ्य आहे. त्यामुळे त्याच्या ठिकाणी संयम आणि विवेक आहे. म्हणूनच 'प्रतिनिधी' कवितेत तो ग्वाही देतो.

> ''आता कुठे कड फेरण्याचा विचार सुरु आहे.''[५]
>
> ('प्रतिनिधी', पृष्ठ क्र.२१)

विवेकाचा लगाम मनाला लावून जगताना, वास्तवातल्या शोकांतिका पहात असताना प्रस्थापित समाजाची 'दहशत' जाणवतेच ही दहशत अनुभवताना अटळपणेच या समाजाचे व्यवस्थापन, आपले आजवर झालेले शोषण, वर्णव्यवस्थेने केलेला छळ, अन्याय माणसाला पशुपातळीवर जगायला लावणारी तत्त्वज्ञानाने धर्म संस्कृती इत्यादींच्या इतिहासाचे स्मरण होते तरी देखील,

> ''तुम्ही आजपर्यंत खूपच गाजवून घेतली
> आता बोलण्यासारखे कायआहे ?
> ................................
> आम्ही तर पुटपुटलो नाही
> ओठावर बोट ठेवून चूप आहोत''[६]
>
> ('दहशत', पृष्ठ क्र.२६.)

हे चूप राहणे म्हणजे अंतर्मुख होऊन आत्मशोध घेणे आहे. अशा आत्मशोधानेच कृतीला बळ मिळते. इथे चालत असलेल्या गलथान कारभाराची चीड येते काय उलटे चालले आहे तेही कळते पण –

''आपण फक्त वाईट शिव्याच देऊ शकतो
उगाच त्वेष चघळण्यात अर्थ नाही''[७]

('तुझे विचार माझे आहेत', पृष्ठ क्र.६६)

हे प्रखर वास्तव लक्षात घ्यावे लागते. आजच्या वास्तवात धर्माचे पुनरुज्जीवन होत आहे. त्यामुळे अनेक संघटना झाल्या असून गटबाजीचे राजकारण चालू आहे. आंबेडकरांनी निर्माण केलेले स्वातंत्र्य वेगळ्या स्वरुपात पुढे आले आहे. समाजाचा जुना एकसंघपणा नष्ट झालेला आहे. आत्मशोधातून आपल्याच दलित समाजातले हे वास्तव पाहतांना कवीला कळते की, आपण कृतिशून्य प्रगतिवादी आहोत हेच खरे कारण घराला कुलुप लावून दारावर किल्ली ठेवायची ही आपली जुनी सवय 'सत्तेपुढे शहाणपण चालत नाही' असे म्हणत आपण आपली बुद्धी आपले शहाणपण बाजूला टाकले. वाट्याला येईल ते भोगत जगत आहोत. या आत्मशोधाने कवी अंतर्यामी दुखावले असून ते म्हणतात,

''अशा सवयी आपण विसरायला हव्यात !
तप्त, विराट मोर्चाचे रुपांतर शेवटी आमसभेत होते.
यापेक्षा आणखी शोकांतिका कुठली होऊ शकेल''[८]

('एका मोर्चाचा शेवट', पृष्ठ क्र. ३४)

ही आपली शोकांतिका कवीला अतिशय अस्वस्थ करते. त्याला प्रश्न पडतो की, 'आपल्या दूर गेलेल्या प्रगतीशील नजरा परतून कां येतात ?'

म्हणजेच आपले असे खच्चीकरण कां होते आहे ? समाज अधोगतीकडे कां जातो आहे ? याचे उत्तर शोधतांना त्याला कळते की, पारंपरिक व्यवस्थापनच वरचढ झाले आहे. सत्तेपुढे शहाणपण चालत नाही. हेच या संस्कृतीनं मनावर बिंबवल आणि सत्ता उपभोगत राहिली दुसरं काय ?

''अनादी काळापासून चालत आलेल्या मूलतत्त्ववादी प्रवृत्तीनी अनेक विचार परंपरांना नेस्तनाबूत करण्याचा प्रयत्न केला. माणसाचा विचार करणाऱ्या अनेक क्रांतीकारी विचारांची परंपरा खंडित करण्याची रुढी या देशात होती आणि आहे. या रुढीने काळाच्या प्रत्येकच टप्प्यावर अविचारी कृत्य केले आहे.''[९] असे महेंद्र भवरे म्हणतात. असेच

अविचारी कृत्य म्हणजे आंबेडकरी विचारांना विकृत वळण लावण्याचा विद्रुप करण्याचा प्रयत्न आजच्या काळात झाल्याचे कवी 'डॉ. भीमराव रामजी आंबेडकर उर्फ बाबासाहेब' या कवितेत सांगतात, एकदा असंख्य माणसांचा तप्त समूह रस्त्यावर आला समूहाने शहरातले सगळे पुतळे तोडायला सुरवात केली. काहींचे डोके फोडले, काहींना आडवे पाडले, काहींना विद्रुप केले शेवट ते माझ्या (आंबेडकरांच्या) पुतळ्याजवळ आले.

''क्रुद्ध समूहातील एक संथ पावलांनी समोर आला
आणि
अल्प श्रमाने त्याने माझे दिशा दाखविणारे बोटच तेवढे तोडले''[१०]

('डॉ. भीमराव रामजी आंबेडकर उर्फ बाबासाहेब',पृष्ठ क्र. २३)

मूलतत्त्ववादी चांगल्या गोष्टी येथे रुजूच देत नाहीत. 'दिशा दर्शक बोटच तोडले' दलित समाजात फूट पाडण्याचा हेतू ठेवूनच कार्य करतात. समाजाचा एकसंघपणा नष्ट करतात समाज विस्कळीत आणि दिशाहीन करण्याचा प्रयत्न आज मोठ्या प्रमाणात चालू आहे. व्यवस्थेकडून अशी हीन पातळीवरची कार्ये होत आहेत. ही व्यवस्थाच सडली, कुचकी आहे असे त्याला वाटते. लोकनाथ यशवंताचे आंबेडकरांच्या वरचे हे चिंतन अत्यंत हृदय आहे.

विषम समाजव्यवस्थेमध्ये शहरी संस्कृतीत गरिबांच्या अश्रूनां काहीच मोल नसते म्हणूनच -

''कारखानदाराच्या उत्पादक जाहिरातफलकाला
कुणी मजूर खिळा मारताना दिसला की,
मला येशू ख्रिस्ताचीच आठवण होते''[११]

('एक शून्य आणखी', पृष्ठ.क्र. १७)

येथे आर्थिक विषमतेने समाजाला ग्रासलेले दिसते. येशू ख्रिस्ताला जसे खिळे ठोकलेत त्याचप्रमाणे या कारखानदारांनी मजुरांना खिळे ठोकले आहेत. हे खिळे आहेत अत्याचाराचे, अन्यायाचे, परावलंबनाचे.

अनेक शतकांचा अत्याचारी इतिहास हा दलित समाजाला विसरताच येत नाही. सनातन्यांनी आपली प्रस्थापित काठी सतत उगारली, तरी आम्ही जनावरांसारखे मार खाऊन स्वस्थ बसलो होतो. कारण आमच्यात सामर्थ्य नव्हते ते काठी पकडण्याचं, पण आता –

"मी आता त्वेषाने मागे वळून
काठीवर चाल करणार आहे"[१२]

('आरंभ', पृष्ठ.क्र. २०)

अत्याचाराला विरोध करण्याचं सामर्थ्य दिलय् आंबेडकरांनी, स्वत्वाची जाणीव होऊन जगण्याचं मोल कळल्यापासून परंपरागत दास्यातून मुक्त होण्याची प्रेरणा मिळाली. प्रस्थापितांनी केलेल्या अन्यायाबद्दल सूड उगवलाच पाहिजे.

"ते भेटले की त्यांना अदबीने
नमस्कार करावा,
एवढ्यानेही मानत नसतील तर
जोहाराचे सोंग घेऊन
त्यांच्या पोटातून शिंग आरपार काढावे"[१३]

('दंडवत', पृष्ठ क्र.५७)

याशिवाय दुसरा मार्ग नाही असे कवी लोकनाथ यशवंत यांना वाटते. 'होऊ द्या आंगभर' या कवितेत कवीला स्वसामर्थ्याची जाणीव झालेली आहे. म्हणूनच 'नकार' देण्याचं बळ त्यांच्यात आलेलं आहे. प्रस्थापितांनो, आतापर्यंत तुमची सत्ता होती. पण –

'आता तुम्ही आमच्यासोबत सांभाळून वागलं पाहिजे
झालं ते फार झालं
तुमच्या इमारतीच्या पायातले दगड आमचे आहेत
ते आमचंच ऐकतात
तुम्ही वेळेला ओळखलं पाहिजे
संभाळून वागलं पाहिजे
तुमच्या इमारतीचा पाया आमचाआहे
आम्ही तो कधीही हलवू शकतो '

हे सामर्थ्य आहे. आंबेडकरवादी चळवळीच''[१४] असे या काव्यसंग्रहाबद्दल समिधा चव्हाण यांनी आपले मत व्यक्त केले आहे.

थोडक्यात 'बुद्ध-फुले-आंबेडकरी' विचारांचा जन सामान्यात रुजवून त्यांच्या हक्काची जाणीव करून देणे व स्वत:चा 'निसर्गदत्त अस्मितेसाठी' बुलंद लढा उभारणे हे लोकनाथाच्या कवितेचे वैशिष्टये आहे. दलित, पीडित, आदिवासी, मजुरांचे शत्रू हेरून त्यांचे प्रचलित हत्यार बोथट करण्याचा उपक्रम लोकनाथांच्या कवितेत आपणास बघायला मिळतो. या दोन प्रवृत्तीचा असणाऱ्या नेत्यांना केलेल्या अत्याचाराबद्दल कवी ठणकावून सांगत आहे.

''लक्षात असू द्या
पूर्वी जोहार करणाऱ्याच्या हातांत
आता तीक्ष्ण हत्यारं आहेत''[१५]

('कुपाच्या बाहेर', पृष्ठ क्र. ५६)

इथली तीक्ष्ण हत्यार आहेत विचारांची, विचार तलवारीपेक्षा प्रखर असतो. हाच विचार पुढे परिवर्तन घडवून आणतो, पिचलेला श्रमिक शोषित समाज हळूहळू जाम होत असलेला आपणास दिसतो आहे, म्हणून कवी म्हणतात,

''तुझा चेहरा, तुझे डोळे निर्विकार असले तरी
तुझ्या मुठी आवळताहेत याकडे माझे लक्षच नव्हते''[१६]

('मुठी', पृष्ठ क्र. ६४)

समाजातील मुलभूत गरजांना मुकलेल्या दीन-दु:खीतांच्या प्रश्नांना कवी लोकनाथांनी तितक्याच सहानुभूतीप्रमाणे आपल्या कवितेत हाताळतात -

''कॉम्रेड चालतो सिमेंट रोडने भरभर
आजूबाजूच्या इमारतींना न्याहाळत
लिरील साबणाने
चैतन्यात नाहणारी हसीना
कॉम्रेड बघतो
'बाँबे डाईंग'च्या जाहिराती

आणि अलगद जातो हात
फाटक्या तुमानीवर....''[१७]

('मार्क्सवादी', पृष्ठ क्र.७२)

दलित आणि प्रस्थापितांच्या संघर्षाचा विषय विद्रोही कवितेत हाताळताना कवीची लेखणी....

''इथपर्यंत त्यांचे फार झाले
आणि आपलेही पुष्कळ झाले
आता आपण उठून उभं राहिलंच पाहिजे''[१८]

('उभे राहण्याची कविता', पृष्ठ क्र.३९)

ही संयमी वृत्तीच दलित कवींच्या मग प्रथितयश असोत की नवोदित कवितेत कुठेच आढळून येत नाही. हेच कवी लोकनाथांच्या लेखणीचे गमक आहे. डॉ. बाबासाहेबांच्या विचाराने प्रभावित झालेला हा समाज आता गप्प बसणार नाही, आतापर्यंतच्या वर्णसंस्कृतीने आमचेवर खूप गाजवून घेतले, बंदीत्त्वाला ह्या हजारो वर्षांच्या भिंती तोडून धर्मांतराने आम्ही मोकळे झालो आहोत.

'पहिल्या पावसाची गोष्ट', 'पलायन', 'मोर्चा', 'युद्ध', 'अतिक्रमण', 'गृहयुद्ध', 'प्रवाह', 'कथा' ह्या कवितांमधील भिन्न समाजजीवन हृदय पिळवटून टाकणारे आहे. समाजामध्ये होणाऱ्या अन्यायाविषयी कविच्या विद्रोही भावना ओळी-ओळीमधून भडकून उठताहेत. 'कथा' या कवितेत म्हणतात,

''एकेक डोळा सांगून जातो, अंतरबाह्य हेलावून
टाकणारी अन्याय कथा,
की, तुला अखेरपर्यंत खऱ्यात खोटे असल्याचा
निर्णयच लावता येणार नाही
..................................
माझ्या डोळ्यातील अन्याय कथांचे संदर्भ
शोधण्याचा तू सध्या प्रयत्न करू नकोस
कारण हे आपल्यांनीच केलेले कर्तृत्व आहे

आपणाला आपल्या घरातच लढाई लढावी लागते.''[१९]

('कथा', पृष्ठ क्र.५२,५३)

घरातच लढावे लागण्याविषयी कवीला दु:ख वाटते. तो तशी खंत व्यक्त करतो.

''आपल्या जगण्याविषयी 'प्रार्थना'मध्ये कवी आपण कसे वागावे ह्याविषयी म्हणतात-

'आपण आपली जगण्याची तऱ्हा वेळीच
ठरावी
चांगली शहरे
चांगले खावे, चांगले प्यावे
भारी सिगरेटी ओढाव्यात,
शोषकांच्या शरीरावर तुटून पडावे
सुरेख पोरी भोगाव्यात - प्रसिद्ध
स्त्रियांचे चुंबने घ्यावीत'

हे सर्व भोगतअसताना मृत्यू आला तर जीवनाला गुडबाय करावा, आशयासारखा सुखलोलूपतेबरोबर त्यांची त्यागी जीवनाला सामोरी जाण्याची तयारी दर्शवितात.[२०] असे इंदूमती लहाने म्हणतात. कवी लोकनाथ यशवंत यांच्या कवितेवरती कवी नामदेव ढसाळ यांच्या कवितेचा प्रभाव पडलेला आपणास दिसतो. पुढील ''कवितेत सर्वत्र उपरोध-गर्भता ठासून भरलेली आहे. एकच उदाहरण पाहा -

'या शहराच्या विषमतेविषयी
तू सध्या एकही प्रश्न विचारू नकोस
इथे झुंबराच्या दुकानातच अंधार असतो '

लोकनाथची कविता अलंकारांनी नटवलेली नाही. आशयसंपन्नता हेच तिचे सौंदर्य आहे ही कविता पारदर्शी आहे. प्रतिमांचा गुंता नसल्याने ही कविता हृदयाला भिडते.''[२१] असे भगवान भोईर म्हणतात. येथे त्यांची कविता अलंकारांनी नटलेली नाही तर तिचा आशय हेच तिचे सौंदर्य आहे. प्रतिमांचा गुंता नसल्याने ही कविता हृदयाला भिडते.

मराठवाडा विद्यापीठाला नामांतरचा लढा हा आम्ही असाच लढतो. सध्याही त्याच पद्धतीने लढत आहोत. आमचा संघर्ष कसा असावा हे 'शस्त्रांच्या कवितेत' कवी लोकनाथ यशवत सांगतात –

''एक डोळा पापणीने विझवून,
सर्व शक्तिनिशी मी धनुष्य ताणले.
बाण नियोजित स्थळी लागूनही परिणाम शून्य
प्रतिकारांची शस्त्रे समयानुरुप वापरावीत
हे तुम्ही सांगितलेले, मी
नेमक्या क्षणी कसे विसरलो ?
कवी पुढे म्हणतात.....
बंदूक खांद्यावर टांगताना
कमरेची काडतुसे तपासून घ्यावीत
अन्यथा शिकार समोर असते
पण –
फक्त चापाचाच आवाज येतो''[२२]

('शस्त्राच्या कविता', पृष्ठ क्र.२४)

आज आमच्यावर होणाऱ्या अत्याचाराचे डोंगर रचत आहे. बेलच्छी लुंबिनी, मिनाक्षीपुरम,विरखणी आदि हत्याकांड इतिहासाला साक्षी आहेत. अत्याचार करणारे मात्र निर्दोष सुटत आहेत. विखणी हत्याकांडातील बरी सुटले लुंबिनी हत्याकांडातीलही आरोपी निर्दोष सुटले. तरी आम्ही कसे शांत ? बंडखोर कवी लोकनाथ यशवंत यांना हे पाहावत नाही, सोसवत नाही, 'दोन कामगारांच्याा गोष्टी' या कवितेत त्यांनी म्हटले.....

''हे पक्षी विद्रोह करून येत असतात
आणि विद्रोह करायला जात असतात
दोस्त, आपणाला पक्षी नाही होता येणार का ?''[२३]

('दोन कामगारांच्या गोष्टी', पृष्ठ क्र. ३५)

लोकनाथच्या कवितेचा प्रवास हा स्वैरसंचारी आहे. या कवितेला कुठलाही विषय अस्पर्श नाही. महान शायर मरहूम मिर्झा गालिब पासून तर संध्या देशपांडे पर्यंत कवीचे रसिक व संवेदनशील मन अनेकांना आपला कवीविषय बनविते.

या देशातील अस्पृश्य समाज कैक शतकांपासून नागविला जातो आहे. कधी देवाच्या, कधी धर्माच्या तर कधी कर्मवादाच्या आणि पुनर्जन्माच्या नावावर ! या चेहरा नसलेल्या आत्मविस्मृत समाजास निराशावादाने ग्रस्त केले आहे. अशा वेळेस आपल्या 'नाही असे नाही !' या कवितेमधून आशावादाचे दुर्दम्य बळ अधोरेखित करतांना कवी म्हणतात की,

''या झाडं नसलेल्या मुख्य रस्त्यावरून एखाद्या दिवशी
आपल्या मनासारखा मोर्चा निघेल
वाट बघण्यास तशी काहीच हरकत नाही !''[२४]

('नाही असे नाही !', पृष्ठ क्र.६०)

येथे कवीने जुन्या पिढ्यांविषयी भ्रमनिरास झालेला आहे. राजकारण, देशकारण, साहित्यकारण सगळीकडे गटबाजी, दुभंगलेपण दिसते. त्याचे 'परावर्तन' समाजावरही दिसते.

व्यंगात्मक भाषेचे नमुनेही समकालीन दलित कवितेत पहावयास मिळतात. या दृष्टीने कवी लोकनाथ यशवंत म्हणतात,

''प्रत्येकाचे एकेक तत्त्वज्ञान असते
स्वत:च्या सोईसाठी
गाढव तसे एकजात गाढवच
म्हणजे बुद्धिमान'' [२५]

('गाढवांच्या कविता', पृष्ठ क्र.५०)

'गाढव' हा शब्द अनेक अर्थाने रूढ झालेला आहे. गाढव हा प्राणी तसा खाली मानेने जगणारा, चालणारा. रट्टे सहन करणारा. 'गाढव तसे एकजात गाढवच म्हणजे बुद्धिमान' असा एक नवाच अर्थ गाढवाला प्रदान केलेला दिसतो. तत्त्वज्ञान ही शाखा मानवी समाजाशी निगडीत असून माणसाला महान मानण्यापासून माणसाला नागविण्यापर्यंतही या

शाखेची मजल जाऊ शकते. तत्त्वज्ञानाचा असाही वापर झाल्याचे भारतीय संस्कृतीत निदर्शनास येते. तसाच प्रयोग कवी करतो. 'गाढव' शब्दाला नवा वेगळा 'बुद्धिमान' असा अर्थ देतो. कारण–

''नित्य खाली मान असणाऱ्या गाढवांनी
एकदा आपल्या मागच्या पायाकडून विद्रोह केला
की माणसाचा चेहरा एंडबेंड''[२६]

('गाढवाच्या कविता', पृष्ठ क्र. ५०)

ही खरी गाढवाची मेख आहे. आपण आजवर गाढवासारखे व्यवस्थेप्रमाणे जगलो. आता विद्रोह करून जगू या. गाढवाच्या मागच्या पायाच्या विद्रोहाने समाजव्यवस्थेत बदल होईल अशी अटकळ कवी करतो.

आपआपल्या विचारात गुंग
प्रत्येकाची नेहमीसारखी भेदरलेली नजर''[२७]

('डोळे', पृष्ठ क्र. ५१)

कवी लोकनाथ यशवंतांची कविता मराठी काव्य प्रांतातील क्रांतीचा हुंकार देणारी कविता म्हणून गणना करावी लागेल. त्यांची कविता नव्या जगाचे व नव्या समाजरचनेचे उज्ज्वल स्वप्न पाहणारी आहे. म्हणूनच कवी 'नव्या शहराविषयी' या कवितेत म्हणतात –

''आता या विशाल औद्योगिक शहराच्या मर्यादा
तुझ्याप्रमाणेच मलाही भासू लागल्याहेत छोट्या
चल,
आपण आपले एक छोटे नवे नगर वसवू
ज्याची मानसिकता अमर्याद असेल.''[२८]

('नव्या शहराविषयी', पृष्ठ क्र. ५५)

वरील कवितेच्या ओळीमधून त्यांनी सध्याच्या जागतिकीकरणामध्ये चालू असणाऱ्या घडामोडीवर प्रकाश टाकला आहे. त्यांच्या प्रत्येक कवितेत जणू गुदमरलेले सामाजिक मन हंबरडा फोडत आहे असे वाटते. या आक्रोशात केवळ दुबळेपणा नाही तर परिस्थितीचे

आव्हान पेलणारा दणकटपणा सहज व्यक्त झाला आहे. ही आक्रमकता ही परिस्थितीनेच आपणास दिली असे ते आपल्या 'कांगावा' या कवितेतून सांगतात.

''वारंवार त्यांनी आपल्या झोपड्या तोडल्या
आपण पुन्हा पुन्हा बांधत गेले
ते तोडत गेले
आपण बांधतच गेले
आता फक्त एकदाच
आपण त्यांच्या इमारती नेहमीसाठी तोडून फेकल्या
त्यांचा इतका कांगावा कशासाठी ?''[२९]

('कांगावा', पृष्ठ क्र. ६८)

लोकनाथांच्या कवितेतील संघर्षामध्ये असणारा म्होरक्या डोळस आहे, सावध आहे. त्याला युद्धपूर्व इतिहासाची जाण आहे आणि युद्धाच्या अनिवार्यतेचे भान आहे. परिणामाविषयी तो निश्चित आहे. त्यामुळे ही कविता संघर्षाची एक वैचारिक प्रक्रिया व्यक्त करते.

'मार्क्सवादी' ही या कवितासंग्रहातील एक लक्ष वेधून घेणारी व्यक्तिचित्रात्मक कविता आहे. त्याच कॉम्रेडचे वास्तव जीवन आणि स्वप्न, तत्त्वज्ञानाची झेप आणि तत्त्वज्ञानाचा पराभव यांच्या रंगरेषा एकत्र मिसळल्या आहेत. तसेच या कवितेचे आणखी एक वेगळेपण सहज लक्षात येते की ही कविता सामाजिक संघर्षाची केवळ जड भाषा बोलत नाही तर जीवनाचा ललित तरल भाव या कवितेत हळुवारपणे येऊन जातो. पण त्याला ही असमानतेच्या दाहकतेची एक किनार निश्चित असते.

''पायांना कोड असलेल्या मोराचे पंख
नाचता नाचता गळून जावेत आणि
बाजूच्या भिकाऱ्याने ढेकर द्यावा
पोट भरल्याचा................''[३०]

('क्रान्ती', पृष्ठ क्र.२६)

या कवितेतून कवीने आतापर्यंत म्हणजेच समाजामध्ये जो अन्याय, अत्याचार झाला त्याचे विदारक दर्शन कवीने यातून केले आहे. 'आता होऊन जाऊ द्या !' हे केवळ या कवितांचे सामुहिक शीर्षक नाही, तर तो या दलित शक्तीने सामाजिक संघर्षात घेतलेला पवित्रा संघर्षाच्या निर्णयकतेची ग्वाही देणारा आहे. जाती-जमातीत विखुरलेला व गतेतिहास एकच असलेला हा बहुजन समाज एकत्र येत आहे हे सांगताना कवी श्रेयाचे बोट डॉ. आंबेडकरांच्या समाजाकडे दाखवितो.

> ''पाय मोडलेल्या माणसांचा समूह
> आपल्या वस्तीकडे भर वेगाने धावत येताहे
> ..........................................
> लोलक नसलेल्या घंट्यांचा आवाज कसा दुमदुमतो आहे गावभर
> आणि काटे नसलेल्या घड्याळ कसे अचूक चालले आहे वेळेवर.''[३१]
> ('काटे नसलेले घड्याळ ! दोन मत' पृष्ठ क्र. ५४)

अनादिकाळापासून मूक असलेला हा समाज डॉ. आंबेडकरांच्या प्रेरणेने बोलका झाला. या देशातील ब्राह्मणशाहीने त्रस्त झालेला मागासवर्गीय समाज हा इतिहासाच्या अज्ञानाने व भटशाहीने अजूनही आपसात लढत आहे. याचे चित्रण कवीने वरील कवितेमधून केले आहे.

## ३.२ आत्मनिवेदनपर कविता :

कवितेतून अनेकदा 'मी' चा आविष्कार होतो. तो जरी आत्मविष्कार असला तरी दलित कवी 'मी' मधून 'आम्हीचा' म्हणजे समूहमनाचाच आविष्कार करीत असतो. तो आंबेडकरी विचारांच्या क्रांतीकारी चळवळीचाच तो एक घटक असल्यामुळे समाजमनाचा एक भागच त्यातून व्यक्त होत असतो. म्हणून कवी म्हणतात.

> ''अनादिकाळापासून एक प्रस्थापित काठी
> सतत आपल्या पाठीवर उगारून आहे''[३२]
> ('आरंभ' पृष्ठ क्र. २०)

या उगारलेल्या काठीच्या दहशतीखालीच आपण आजवर जगलो. प्रस्थापित समाजव्यवस्था, रूढी, संस्कृती यांच्या वर्चस्वाखाली जगलो. खाली मान घालून थांबणे, निमुटपणे अत्याचार सोसणे असाह्यपणे अन्यायसहन करणे भाग पाडले आजही आपण जनावरासारखे दिशाहीन धावत आहोत हे सहन करणे शक्यच नाही तेव्हा

''मी आता त्वेषाने मागे वळून
काठीवर चाल करणार आहे.
तुमच काय, तुम्ही ठरवा''[३३]

('आरंभ' पृष्ठ क्र. २०)

'भित्यापाठी ब्रहमराक्षस' या म्हणीप्रमाणे आपण भ्यालो तर ते आपल्याला सतत भितीच दाखवणार उगारलेल्या काठीला न भिता त्या काठीवरच वार केला पाहिजे मी असा हल्ला करण्याचा निर्णय घेतला आहे. असे करणे आता आवश्यकच बनलो आहे तुम्ही काय करायचे ते तुमचे तुम्ही ठरवा. ज्याचे त्याने ठरविणेच महत्त्वाचे आणि गरजेचे आहे. एक एक मिळूनच समूह होणार आहे.

एकदा जागृत आलेल्या समूहांचा एक मोर्चा निघाला आम्ही पुढे मोर्चा मागे अशी स्थिती आशादायक होती. काही वेळाने एकाएकी मोर्च्याचे संतुलन बिघडले शस्त्रधारी पोलीस मोर्च्याच्या समोर आले. त्यांना बघताच सावध नायक मागे गेले एवढेच नव्हेतर ऐनवेळी अटीतटीच्या संघर्षाच्यावेळी नेत्यांनी पळ काढला. तेव्हा रस्त्यावरच्या छक्याने त्यांना गांडू म्हटले केवढा हा अपमान !

कवी यातून समाजातील नेत्यांची पलायनवादी वृत्ती दाखवतो नेत्यांच्या कानडी बचावू धोरणामुळे समपटीचे बळ कमी होते. आश्वासकता जाते नैतिकतेचे बळही ओसरून लोकांचे मानसिक खच्चीकरण होते. याचे कवीला खूपच वैषम्य वाटते. या प्रवृत्तीचा तो निषेध करतो कारण एका षंढाने पुरूषार्थाला आव्हान देणे मुळीच भूषणास्पद नाही आजच्या काळातील निष्ठा ढळलेल्या, कमजोर नेतृत्व असलेल्या स्थितीशीलन समाजाचे कठोर भीषण वास्तव कवीनेच 'लीडर' कवितेत रेखाटले आहे. आपल्याच समाजाच्या या स्थितीचे

निरीक्षण करून चिंतन करताना, आत्मशोध घेतांना कवीला जे कळते, जाणवते ते त्याने 'शस्त्राच्या कविता' मध्ये सांगितले आहे.

> ''सर्व शक्तिनिशी मी धनुष्य ताणले
> बाण नियोजित स्थळी लागूनही परिणाम शून्य''[३४]
> ('शस्त्राच्या कविता' पृष्ठ क्रं. २४)

असे होण्याचे मुख्य कारण हे की, प्रतिकाराची शस्त्रे वापरताना ती योग्यवेळी वापरली पाहिजेत. भलत्या ठिकाणी बंदुक वापरू नये बंदुक जवळ असताना चाकूपण असू द्यावा बंदुक, तलवार, चाकू यापैकी कोणते शस्त्र येथे वापरले पाहिजे. याचा विचार करून ते वापरावे शस्त्र महत्त्वाचेच असते. म्यानातून तलवार काढताना ती झटक्यात काढल्यास ती आपल्याच मानेवर येण्याची शक्यता असते. हेही लक्षात असू द्यावे तसेच अनेक पिढयांच्या जुन्या तलवारी हळुवार पुसाव्यात समाजाविरूध्द न्याय हक्कासाठी लढायला शस्त्र हवेच.

१९६० नंतरच्या काळात तळागाळातल्या दलित शिक्षित लोकांमध्ये विचारांचे एक स्फुल्लिंग चेतवले गेले. ते सर्व साहित्यातून साकार झाले. आंबेडकरांच्या या विलक्षण चेतना शक्तीचे कवीला अप्रुप वाटते. आंबेडकरांच्या भाषणाचा किती मोठा प्रभाव होता. त्यांचे अप्रत्यक्ष किंवा सूचक बोलणेसुध्दा किती प्रभावी होते हे कवीने 'कांजी' कवितेत 'कोडवाडा' हे समाजव्यवस्थेचे प्रतिक वापरून फार सुंदरपणे सांगितले आहे.

> ''वर्षापासून कोंडलेली सगळी गुरे
> कोंडवाडयाच्या भिंती तोडून बाहेर पडली''[३५]
> ('कांजी'पृष्ठ क्र.२७)

भिंती तोडून बाहेर पडण्याइतकी ताकद एकाएकी या गुरांच्या ठिकाणी कशी आली? हे कधी झाले? कसे व का झाले? काही कळलेच नाही. सर्व गुरे कोंडलेल्या स्थितीत वर्षानुवर्षे रहातच होती फक्त त्यांच्या हंबरण्याचा आवाज यायचा कोंडवाडयातून सुटण्यासाठी काही प्रयत्न करीतच नव्हता ?

"कोंडवाडयापुढच्या भाषणात फक्त एवढेच बोललो
हे कुठपर्यंत चालणार ?" [३६]

('कांजी', पृष्ठ क्र. २७)

या एका सूचक प्रश्नाने गुंराची गुरासारखे जगणाऱ्या माणसांची गति जागृत होऊन विचार करू लागली. तेव्हा त्यांना आपल्याला कुणीतरी मुद्दाम कोंडवाडयात ठेवले आहे. भोवतीच्या कुंपणामुळे कसलेही स्वातंत्र्य नाही. कुठेही जाताच येत नाही इत्यादी गोष्टींची जाणीव झाली आता हे चालू द्यायचे नाही हे आपण सर्वांनी ठरविले पाहिजे ही जाणीव झाली एकसंघ होऊन बाहेर पडण्याचे ठरविताच समपटीच्या ताकदीमुळे भिंती तोडून ती बाहेर पडली. कोंडवाडा म्हणजे मानवनिर्मिती समाजव्यवस्था जर आपल्यावर अन्याय करीत असली तरी व्यवस्थाच आपणच मोडली पाहिजे त्यासाठी आपण स्वतःच प्रयत्न केले पाहिजेत हे नवे ज्ञान नवी जाणीव आंबेडकरांच्यामुळे आपल्या समाजाला लाभली. याबद्दल कवीला कृतज्ञता वाटते. बंधनात राहणाऱ्या समूहमनाचे अस्तित्व बंधमुक्त होण्यासाठी उत्सुक असते. अशा समूहांना त्यांच्याच अस्तित्वाची ओळख व आत्मभानाची जागृती होण्याची गरज असते. ते काम आंबेडकरांनी केले आंबेडकरांच्या ऐतिहासिक क्रांतीकार्याची व त्यांच्या श्रेष्ठ व्यक्तिमत्वाची दखल घेऊन दलित व पददलितांचा उध्दार करण्याची त्यांची ताकद किती महान होती हे कवीने सांगितले आहे.

आजच्या सामाजिक वास्तवाचे आत्मभान कवीला अतिशय अस्वस्थ करते. आत्मपीडा देते. त्यामुळेच

"माझ्या मेंदूच्या प्रत्येक नसेमध्ये
भयंकर असहय आवाज होतात ! का होतात?
याचे निदान कुणीही करू शकलेला नाही !" [३७]

('बंद खोलीचे प्रकाशणारे कोपरे'पृष्ठ क्र. २९)

मनातल्या मनात होणाऱ्या या उपाशी आक्रोशाने मेंदू फुटणार की काय असे वाटू लागते. त्याच्या या स्थितीमुळे तो वेडा झालाय किंवा लवकरच वेडा होणार आहे. असे आजूबाजूचे लोक आपसात बोलतात. त्याला वेडा ठरविणारे आणि समाजातील इतर

सर्वजण यांना संघर्ष किंवा अराजक नको आहे. प्रस्थापित समाजव्यवस्थेत होणारी गळचेपी कळतच नाही. त्यांना फक्त जीवनावश्यक वस्तुंच्या भावाबद्दल बोलणे, त्यासाठी मोर्चे काढणे घोषणा देणे एवढेच आवडते. सर्वांचे लक्ष आजकाल फक्त आपल्या पोटजाती भरण्यावर केंद्रित झालेले आहे. जो तो आपल्यापुरते बघतो आहे. दलितांमधल्या जाती पोट जाती सांभाळत भाववाढीवर घोषणा देत दलितांचे जगणे कवीला स्थितीशील आणि न रूचणारे वाटते त्याने त्याची घुसमट होते आहे. कारण ही स्थिती समाजाला अधोगतीकडे नेणारी आहे असे कवीला वाटते.

आज आपल्या दलित समाज अधोगतीच्या मार्गाकडे जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे त्यामुळे पुन्हा एकदा बंधमुक्तीच्या लढयांना प्रेरणा देण्याची गरज निर्माण झाली आहे असे कवीला वाटते म्हणून

''नफिसा, मी काही काळ या दगडाच्या प्रदेशातच
हाडामासांच्या जिवंत मूर्ती कोरण्याचा प्रयत्न करतोय''[३८]

('नफिसा', पृष्ठ क्र. ३१)

असे तो सांगतो. नफिसा हा धर्मसंस्कृतीचा जुनाट प्रदेश सोडून चालली हे ती योग्यच करत आहे. कारण या देवालयाच्या शहरात आणखी त्रासच झाला असता. नफिसाच्या जाण्याला पाठिंबा दर्शवून ते तिला काही मौलिक गोष्टी लक्षात ठेवायला सांगतात -

''माणसाने सांगितलेल्या तिथल्या कुठल्याही तत्त्वज्ञानावर
विश्वास ठेवू नकोस
ते तत्त्वज्ञान फक्त सांगण्यासाठीच असते
तिथला प्रत्येक माणूस हा आपआपल्या सोईनुसार
आपआपले तत्त्वज्ञान करून जगत असतो
.......................................
इथल्या प्रमाणेच तिथेही दोन प्रकारच्या दातांचा व्यवहार असतो.''[३९]

('नफिसा 'पृष्ठ क्र. ३१)

आजच्या सामाजिक वास्तवात माणसे स्वार्थी व ढोंगी झाली आहेत. आपापले सोयीचे तत्त्वज्ञान घेऊन जगताहेत त्यांचे खायचे दात वेगळे दाखवायचे दात वेगळे आहेत. त्यामुळे फसण्याची शक्यता लक्षता घेऊन सावध रहा. मी तुझ्यासोबत येऊ शकत नाही असे ही सांगतो कारण दूर जाऊन या माणसांना सुधारणे म्हणजे उंटावरून शेळया राखण्यासारखे होणार आहे. यास्तव त्याने इथेच राहून जिवंत हाडामासाच्या मूर्ती म्हणजेच न्याय हक्कासाठी लढण्याची तयारी असणारी, मानवता हे मूल्य बाळगणारी माणसे घडविण्याचे ठरविले आहे. कारण आजच्या आपल्या समाजातील एकमेकांचे पाय ओढणाऱ्या, आपआपसात भांडण्याची प्रवृत्ती त्याला मोडून काढायच्या आहेत या प्रवृत्तीच समाजाला विनाशाच्या गर्तेत लोटणार आहेत ते स्पष्टच सांगतात -

''खाटकाकडे चाललेल्या दोन बोकडांतील
एकमेकांवर शिंगे उगारण्याचे प्रकार बंद करायचेत मला''[४०]
('माझी माणस' पृष्ठ क्रं. ३२)

येथे खाटीक-मृत्यू देणाऱ्या सर्वनाश करणाऱ्या गोष्टीचे प्रतिक आहे. वास्तविक दोन बोकडांनी म्हणजे दोन संघटना प्रतिनिधीनी एकमेकांवर शिंगे उभारण्यात काहीच अर्थ नाही उलट दोघांनी एकजूट करून चार शिंगानी खाटकावर हल्ला करून त्याचेच पोट फाडून आपली मृत्युपासून सुटका करून घेतली पाहिजे. असे कवी सुचवतो सर्व समाजाचे हित लक्षात घेऊन प्रबळ संघटनांनी आपापसातील भांडणे बंद केली पाहिजेत हा कवितेचा मतितार्थ म्हणूनच 'कथा' कवितेत कवी प्रेयसीला उद्देशून स्पष्ट सांगतात -

''आपणाला आपल्या घरातच लढाई लढावी लागते'' [४१]
('कथा' पृष्ठ क्र. ५३)

याचे कारण म्हणजे आंबेडकरांच्या विचाराचा कर्तृत्वाचा फायदा सर्वच दलितांना झाला. परंतु आताच्या काळात सारे मिळून चळवळीत दिसत नाहीत. पुढे जाऊन तो म्हणतो की नेहमीसाठी अडाणी असणे सुखाचे असते हे म्हणणे अगदी खरे आहे. आत्मशोधातील या ज्ञानाने मला अस्वस्थ करून सोडले आहे. अन्यायाच्या कथा हे आपल्यानीच केलेले कर्तृत्व आहे हे फारच वाईट आहे.

आपल्याच माणसांचे कर्तृत्व पाहून उद्विग्नता आल्यावर कधी कधी इथून निघून जावेसे वाटते.

> ''पण बंध असे गुंतले आहेत तुझ्यात नि यार दोस्तांत
> की या वस्तीतून हालता ही येत नाही'' [४२]
>
> ('मुठी ' पृष्ठ क्र. ६४)

ही आपली स्थिती पण तो कबूल करतो समाजापासून असे फटकून राहता येत नसते. समोरचा चेहरा, डोळे निर्विकार असले तरी तिच्या मुठी आवळताहेत याकडे माझे लक्षच नव्हते हे तो मान्य करतो ही परिस्थिती त्याला आशादायक वाटते.

असाच आशावाद कवीच्या मनात,

> ''लहान मुलांचा मोर्चा रक्तवाहिन्यासारखा गावात पसरला
> आणि आश्चर्य,
> सगळयांच्या जिभेला शब्द फुटले !''[४३]
>
> ('मोर्चा', पृष्ठ क्र. ४२)

''लोकनाथांच्या कवितेतील लहान मुलं ही क्रांतीच्या ठिणग्या वाटणारी आहेत. ही मुल उद्याच्या उजेडाच्या रक्तवाहिन्या आहेत. मोर्चा सोडून पळून जाणाऱ्या नायकाच्या पार्श्वभूमीवर रक्तवाहिन्यासारख्या पसरणारा लहान मुलांचा मोर्चा समजून घेतला पाहिजे. विषम वर्तमानाला सुंदर स्वप्नांचा स्वरूप बहाल करणाऱ्या भविष्याचे शिल्पकार म्हणून या मुलाकडे पाहता येईल''[४४] असे शरणकुमार लिंबाळे यांनी म्हटले आहे.

> ''माझे अपमानित क्षण मी पेरून ठेवले
> शहरात जागोजाग
> कुठे कधी स्फोट होऊन कोण छिन्न होईल
> काही सांगता येत नाही
> जिथला हिशेब तिथेच चुकविला पाहिजे
> हा माझा हिशेब आहे''[४५]
>
> ('मी जबाबदार नाही', पृष्ठ क्र. ६५)

असे परखड उद्‌गार 'मी जबाबदार नाही' अशा ठाम बेफिकीरीने कवीने काढले आहेत. ही आहे सर्वकष विद्रोहाची जाणीव अपमानित क्षण जर सुरूंगासारखे सर्वत्र पसरलेले असतील तर स्फोट व्हायला काय वेळ लागणार? जिथला हिशेब चुकवायचा ही माझी भूमिका आहे. पुढची दुष्ट पावलं तुम्ही सावधपणे टाकली पाहिजेत. स्फोट होणार हे निश्चित धरून चाला पूर्वी तुम्ही मागे म्हणूनच बिनधास्त होता. आता मी कशालाच जबाबदार राहणार नाही? जे करायचे होते सुरूंग पेरायचे काम ते मी करून टाकले आहे.

## ३.३ प्रेमकविता :

लोकनाथ यशवंतानी प्रियेला उद्देशून ही काही कविता लिहिल्या आहेत. त्यातील भाव उत्कट आहे. परंतु ही प्रिया पारंपरिक जोडीदारीण किंवा साथीदारीण आहे. तिच्या संबंधीच्या प्रेमामध्ये वासना नाही. तर कर्तव्य कठोरतेची भावना आणि प्रेम जिव्हाळा आहे हे एक नवे आयामच निर्मिलेले दिसते.

कवी तिला उद्‌देशून म्हणतात, 'तुझी मुळ माझ्यात खोल. पर्यत रूतलेली आहेत. प्रत्येक मुळ तप्त आहे. साहजिकच मुळांनी नखशिखांन्त व्यापलो आहे.' इथे कवी तू ती मीच, मी तो तूच असा भाव व्यक्त करतात. दोघात इतकी एकरूपता असून देखील तिच्या शितल झाडाची मुळ त्याच्या हातातून बाहेर पडण्यासाठी अतूर झाल्याची जाणीव त्याला होते. आणि मग तो तिला विचारतो –

"ऐ, एक सांग । इतकी तप्त–तप्त जागृत मुळं घेऊन
तू कशी शीतल–शीतल, शांत शांत ....."[४६]

('काहीतरी झालेच पाहिजे',पृष्ठ क्र. २८)

तिचे असे शांत असणे कवीला अधिकच बोचते तिच्यासारखाचं हा समाजमुळी शांत स्थितीशील झाला आहे. कोणालाच काही करावेस वाटत नाही. कवीला मात्र असे स्थितीशील खाली मान घालून निमूटपणे जगणे अस्वस्थ करते. या संदर्भात – "लोकनाथांच्या कवितेतील स्वरूप 'तू' आणि 'मी' चे स्वरूप असे वेगळे आणि विराट

आहे'' असे शरणकुमार लिंबाळे म्हणतात.[४७] येथे कवीला या शहरामध्ये 'तो' आहे 'ती' आहे, हे शहर त्यांच्या संतप्त मनात ढासळताना दिसते.

'तो' आणि 'ती' एकरूप होऊन जगू लागली मात्र त्यांच्या झोपडया तोडल्या गेल्या त्यामुळे आनवाणी अनाथासारखे जगणे त्यांना भाग पडले. हया वस्तुस्थितीने रडणाऱ्या प्रेयसीची कवी समजूत घालतो. तू अशी रडू नकोस त्यामुळे माझ्या हिंमतीचे धागे सैल होतात. मी खचतो. शांत होऊन तू या झाडाच्या बुंध्याशी नीट बस मी तुझ्या मांडीवर डोके ठेवून मनोसक्त रडून घेतो. एकमेकांचे दु:ख समजून घेऊन मोकळे होणे महत्त्वाचे असते. याचाच आज अनेकांना विसर पडला आहे. असे कवी सुचवतात. आपल्या झोपडयांचे डेरे खोलवर रोवून नवी झोपडी बांधू, नवी जागा शोधू असा आशावाद ते व्यक्त करतात तिची समजूतही घालतात आणि शेवटी

''आपल्या दोघांची झोपडी एकच असती तर ?''[४८]

('अतिक्रमण', पृष्ठ क्र. ४६)

असा प्रश्न विचारतो हा प्रश्न अतिशय मार्मिक आहे. आजच्या समाजात प्रत्येकजण आपल्यापुरता स्वत:पुरता घेऊन जगतो आहे. सर्वांनी एका छताखाली येण्याची गरज आहे असे कवीला यातून सूचवायचे आहे. त्यामुळे आपली शक्ती एकवटणार आहे आणि सवर्णांचे फावणार नाही असे कवीला सूचित करावयाचे आहे.

आपली एकजूट झालीच पाहिजे यावर कवी ठाम आहे. कोणाच्यातरी हुकमाने वागण्यापेक्षा स्वच्छेने आणि अंतरिक इच्छेने एकत्रित येणे संघर्षात उतरणे कवीला योग्य वाटते म्हणूनच 'गझल' या कवितेत,

''वेळ ओळखून वागणारा साथी यावेळी

.........................................

या अटीतटीच्या वेळी गझल ऐकवून

खपली झालेली जखम सोलू नकोस''[४९]

('गझल', पृष्ठ क्र.३८)

असे कवी सांगतात. कवीच्या दृष्टीने हुकुमाचे दावेदार होण्यापेक्षा स्वयं निर्णयाची ताकद वापरुन अचूक निर्णय घेऊन योग्यवेळी, योग्य प्रकारचे संघर्ष करण्याची गरज आहे. संघर्ष करणाऱ्यांनी सुद्धा बाह्य परिस्थितीचे आकलन करून घेऊनच पावले उचलली पाहिजेत. भोगलेल्या यातनांचा हिशोब चुकता करण्याची जिद्द मनांत बाळगली पाहिजे. अशा जिद्दीने मुदत असताना ओली गझल ऐकवून म्हणजेच जुन्या पराभवाच्या करूणमय कथा सांगून आपले बळ साथीदाराने कमी करू नये असे कवीला वाटते.

'गृहयुद्ध' या कवितेत आत्मशोधातून झालेल्या यातना, वाटलेले दु:ख कवीने प्रेयसीपुढे व्यक्त केले आहे. तो तिला सांगतो शेवंतीचा गजरा देऊन मी निघून गेलो. तो तुझ्या उशाशी कोमेजून होता. आपल्याला आपल्या मायभूमीतच आपल्याच बांधवाशी युद्धे खेळावी लागतात ही अत्यंत दुर्दैवाची गोष्ट आहे. आपण आप-आपसात झगडतो आहोत. जग मात्र झपाट्याने पुढे जाते आहे. फुलातूनही खतोष्ण दाता आपल्या गळ्यापर्यंत आलेत. आपल्याला नामोहरण करण्यासाठी अनेक शक्ती कार्यरत झालेल्या आहेत. वाऱ्यावरही भरोसा ठरवता येत नाही हे प्रखर सामाजिक वास्तव आहे. ह्या प्रदेशातल्या सगळ्या जुन्या बांधवांचे डोळे बदलून घ्यावे असे मी एकदा म्हणालो होतो. यावर तिचा प्रश्न मोठा मार्मिक आहे ती विचारते,

"डोळे बदलविण्यानेच हे सगळ संपतं काय ?"[५०]

('गृहयुद्ध', पृष्ठ क्र. ४५)

तिच्या या प्रश्नातच 'नाही' हे उत्तर अनुस्युत आहे. कारण आपल्या दलित समाजातल्या वेगवेगळ्या संघटना, पोटजाती, नेते, पुढारी, आप-आपसात भांडत आहेत. म्हणूनच शेवंतीच्या फुलाचा गजरा देखील तपासून घेतला पाहिजे असे नायकाला वाटते. समाजातील माणसांची विश्वासार्हता नष्ट झाली आहे. कुणावर भरवसा ठेवावा, विश्वास ठेवावा हेच कळत नाही. ज्याला साथीदार म्हणावा तोच केसाने गळा कापतो. हे अत्यंत प्रखर सामाजिक वास्तव कवीने 'गृहयुद्ध'मध्ये दाखविले आहे.

## ३.४ प्रस्थापित व्यवस्थेला आव्हान :

''कवीला आनादी काळापासून दलितांचा अमानुष छळ करणारी प्रस्थापित व्यवस्था ही शत्रुस्थानी असल्याचे दिसते. ह्या व्यवस्थेला उद्ध्वस्त करण्याचा इरादा आणि इशारा कवितांमध्ये व्यक्त झाला आहे. सर्वच कविता युद्धाच्या घोषणा देणाऱ्या आणि मानवमुक्तीचा जाहीरनामा घोषित करणाऱ्या आहेत.''[५१] असे शरणकुमार लिंबाळे यांनी लोकनाथ यशवंताच्या प्रस्तुत काव्यसंग्रहाची समीक्षा करताना म्हटले आहे.

लिंबाळे यांचे हे मत मान्य होण्यासारखे आहे. सामाजिक वास्तवावर भाष्य करतांना अथवा प्रेयसीशी संवाद करतांना प्रस्थापित व्यवस्थेच्या विरोधात कडक शब्दात कवीने भाष्य केलेले आहेच. काही कवितात तर अगदी उघड-उघड लढ्याचे आव्हान दिले आहे. 'कुपाच्या बाहेर' कवितेत कवी स्पष्टच सांगतात,

''जोहार करणारे आमचे हात
आम्ही कापून फेकले
आता शस्त्राशिवाय हातात काहीही नाही''[५२]

('कुपाच्या बाहेर', पृष्ठ क्र. ५६)

किती दिवस या उच्च वर्णीयांची हांजीहांजी करीत त्यांना जोहार (नमस्कार) करत लाचारीने जगायचे ? माणूस म्हणून त्यांच्याशी बरोबरीने वागण्याचे राहण्याचे हक्क हवे असतील तर संघर्ष अटळच आहे. म्हणूनच जोहार करणारे आपले हात कापून टाकून त्या हातात त्याने तीक्ष्ण हत्यार घेतली आहेत. हत्याराशिवाय काम होणारच नाही. कवीने आपला आता लाचारी, गप्प बसणे, अन्याय सोसणे सारे सोडून दिल्याचे आणि हाती शस्त्र घेऊन लढण्यास सिद्ध झाल्याचे जाहीर केले आहे.

पुढे जाऊन 'युद्ध' कवितेत प्रस्थापितांना त्याने स्पष्ट आव्हानाच दिले आहे. पूर्वीच्या पिढीतल्या लोकांना आंबेडकरांनी चेतना दिली, प्रेरणा दिली. त्यामुळे ते लढण्यास सिद्ध झाले. तरीही अनेकदा पुरेशी तयारी न करताच ते मैदानात यायचे आपल्या बांधवांना ते विचारतात, 'कशी तुमची लढाई आणि कसला तुमचा विरोध ?, रिकाम्या बंदुकाच नेत

होतात की काय ?' आज मी मात्र अत्यंत सावधपणे पूर्ण तयारीने बंदुकीत काडतूस भरून मैदानावर आलो आहे. मुठी आवळत घरात बसण्यात अर्थ नाही. हे कळालेले अनेकजण माझ्याप्रमाणे शस्त्र होऊन येताहेत.

''तू बघतच रहा !
युद्धाला सुरवात झालीय्''[५३]
('युद्ध', पृष्ठ क्र. ४३)

हे युद्ध सावधतेने, डोळसपणे सुरु केलेले आहे. त्यामुळेच त्याला -

''आता कुठे थोडे डोळे उघडत आहेत
आता कुठे मनासारखे होताहे''[५४]
('छोट्याशा बिंदूत मोठाली स्वप्न', पृष्ठ क्र. ४७)

वाटत आहे. नाहीतर आतापर्यंत रात्रीचा एकेक प्रहर संध्याकाळच्या उदासिनतेने ओथंबलेलाच अनुभव घेतला. समाजाच्या स्थितीगतीचा व विकासाचा विचार करण्यात आत्मशोधातच रात्री घालवल्या आता प्रत्यक्ष उठावामुळे समाधान मिळते.

आत्मशोधातून जे सामाजिक वास्तवसमोर आले आहे ते असेच आहे. सर्वसामान्यांचे हित करायचे म्हणत म्हणत काहीजण प्रस्थापित होऊन गेलेत. दलित सारे एक असा आंबेडकरांचा नारा असतांनाही आपल्यात आता प्रस्थापित आणि खालचे अशी दरी निर्माण झाल्याचे दिसते.

''ज्यांचे प्रस्थापितत्व धोक्यात येते
ते लांबच लांब भाषण देत सुटतात
मी एका वाक्यात
माझी संपूर्ण भूमिका मांडतो.''[५५]
('वाक्य', पृष्ठ क्र.६१)

एका वाक्यात भूमिका मांडणे सहज शक्य आहे. कारण भूमिका विचारपूर्वक तयार झालेली आहे. शिवाय एकसंघतेला व कृतीला महत्त्व आहे. ''ज्यांचे प्रस्थापित धोक्यात येते, ते लांबच लांब भाषण देत सुटतात, ''पोकळ भूमिका घेऊन जगणाऱ्यांच्या पोपटपंचीत

सामान्यांच्या जगण्याबद्दलच्या जिव्हाळ्याचा एक शब्दही नसतो. दुटप्पीपणाने वागणूक समाजाशी प्रतारण करणाऱ्यांना नकार देणारी भावना या कवितेत प्रत्ययाला येते.''[५६] असे महेंद्र भवरेनी म्हटले आहे.

कवीची सर्वजण एक आहोत हीच भावना व भूमिका आहे. मुलभूत आणि नेमक्याच गोष्टी स्पष्टपणे सर्वापुढे मांडल्या पाहिजेत. असे त्याना वाटते. कारण कवीला हे निश्चितपणे माहीत आहे की समुहाचा संताप तीव्र आणि उग्र असतो. संतप्त जनांच्या समुहामुळे रस्त्यावर पडलेले निरर्थक दगडदेखील शस्त्र होतात, मुर्दाड दगडांनासुद्धा नवी चेतनाशक्ती प्राप्त होते.

दलित समाजाला आंबेडकरांचे विचार बुद्धाचे विचार आणि मार्क्सचे विचार आपलेसे वाटतात. या विचारावर श्रद्धा ठेवून जगणाऱ्यांची नेमकी स्थिती काय आहे ? प्रस्थापित व्यवस्था इतकी भक्कम आहे की, मार्क्सवादी विचारवंत (कॉम्रेड) घाण नाल्याच्या कडेला तुटक्या फुटक्या कौलारु घरात राहतो. आखूड पँट घालून फाटकी शबनम खांद्यावर अडकवून अनवाणी फिरतो. मार्क्सवाद्यांचे याचाच अर्थ असा की आमचे विचार माणुसकीचे मूल्य बाळगणारे, समानता मानणारे उत्तम असूनही आम्ही सर्व भौतिक सुविधापासून दूर वंचित आहोत.

हे प्रखर वास्तव जाणवल्यावर संघर्षाची इच्छा आणखी तीव्र होते. आक्रमकता येते. म्हणूनच कवी प्रस्थापितांना ठणकावून सांगतात.

''आता तुम्ही आमच्या सोबत सांभाळून वागले पाहिजे.
झालं ते फार झाल''[५७]

('पाया', पृष्ठ क्र.६३)

शिवाय तुम्ही हे ही लक्षात घ्या की तुमच्या इमारतीच्या पायातले दगड आमचे आहेत. ते आमच ऐकतात. तुमच्या इमारतीचा पाया आम्ही कधीही हलवू शकतो. इमारत पाडण्याचा असा स्पष्टच इशारा कवीने प्रस्तुत कवितेत प्रस्थापितांना दिला आहे. सामान्य माणसाने प्रस्थापित व्यवस्थेला हादरा देण्याची शक्ती कमावलेली आहे. असा विश्वास

कवीला वाटतो. कवीचे हे आव्हान अर्थपूर्ण आहे. झालं ते फार झाले म्हणजेच आम्ही सहनशक्तीच्या पलीकडे खूपच सोसलं आता सहन करण शक्यच नाही असं ते म्हणतात.

## ३.५ पर्यायी संस्कृती उभी करण्याचा आशावाद :

प्रस्थापित वर्णव्यवस्थेला उघड आव्हान देणाऱ्या कवीच्या मनामध्ये नवीन समाजव्यवस्था पर्यायी संस्कृती उभी करण्याची इच्छा आहे. या नव्या व्यवस्थेत सार्वत्रिक समानता असेल. माणसा माणसात भेद केले जाणार नाहीत. माणुसकी हेच मूल्य घेऊनच सर्वांनी जगायचे असल्याने कुणी कुणाला तुच्छ लेखणार नाही. कुणाचा अवमान करणार नाही. प्रत्येकाला वागण्या बोलण्याचे स्वातंत्र्य असेल. प्रत्येकाला जगण्याचा समान हक्क आणि अधिकार असेल.

आजवरच्या सामाजिक इतिहास अभ्यासल्यावर आणि आत्मशोध घेतल्यावर कवीला प्रस्थापित व्यवस्थेला हादरा देण्याची, हातात शस्त्र घेण्याची गरज तीव्रपणे जाणवली आहे. जे नको आहे ते नष्ट करून हवे आहे ते निर्माण करण्याची जिद्द, उमेद कवीने बाळगली आहे.

नशिबावर किंवा कुणाच्यातरी आशिर्वादावर भरवसा ठेवून यशस्वी होता येत नाही. प्रयत्नाच्या जोरावर आपणच आपला ललाट लेख लिहावा हे उत्तम. प्रासन किंवा परावलंबन माणसाला गाफील करते. अशा गाफिल स्थितीत शस्त्रू नेमका वार करून संधी साधतो. म्हणून पुरुषार्थाला सुद्धा निरर्थक करतो.

"नेहमीच आर्द्र हात उंचावून ।
आशिर्वाद दिल्याने होत नाही
आडवेळ बघून षंढही आपणाला
क्रुसावर खिळे ठोकून मोकळे होतात"[५८]
('शस्त्राच्या कविता', पृष्ठ क्र. २५)

हे पक्के ध्यानात ठेवून सतत सावध रहावे. नवे निर्माण्याची उमेद ठेवावी.

"कमजोरांना दुनिया जगू देत नाही
आपण आपल्या शरीरात

लोखंड उतरवून घ्यावे''[५९]

('दंडवत', पृष्ठ क्र.५७)

कवीचे हे सांगणे अत्यंत उचितच आहे. पोलादी मन आणि पोलादी शरीर असल्याशिवाय संघर्ष करताच येत नसतो. समोरासमोर संघर्ष नेहमीच होत नाही तेव्हा गनिमी काव्याने लढावे -

''जोहाराचे सोंग घेऊन
त्यांच्या पोटातून शिंग आरपार काढावे''[६०]

('दंडवत', पृष्ठ क्र.५७)

यशस्वी होण्यासाठी कोणत्याही मार्ग अवलंबण्यास हरकत नाही. मात्र आपल्या सोबत असणाऱ्यांचे भान ठेवावे चुकून पराभव पत्करावा लागला तरी तिथेही एकजूट दिसावी म्हणून 'पलायन' कवीतेत आपल्या बांधवांना आवाहन करतो.

''माणसांनी असे ऐनवेळी पलायन करू नये''[६१]

('पलायन', पृष्ठ क्र.४१)

हे कवींचे मत अतिशय मूलगामी व योग्य आहे. ऐनवेळी पळून जाणे हे आत्मघातकीपणाचे लक्षण आहे. त्यात वस्ती जळत असतांना म्हणजेच जाळली जात असतांना पळून जाणे हे कृतघ्नतेचे लक्षण आहे. जाळणाऱ्यांना धडा शिकविण्याऐवजी पळून जाणे हे नामुष्कीचे आहे. आपल्याला साथ देणाऱ्यांचा अपमान करण्यासारखे आहे असे मुळीच वागू नये.

आजवरच्या शोषणाचा इतिहास सूचक मार्मिक शब्दांत मांडताना कवी म्हणतात, 'लोकांनी तुम्हांला फारच खपवून घेतलं साहजिकच तुम्हीही फारच गाजवून घेतलं आपापसांत संधान बांधून तुम्ही बदमाशी करत राहिलात. आम्ही डोळे किलकिले करून पाहत होतो. आता मात्र नुसते पाहत बसणे शक्यच नाही. कारण आता फारचं झालं. तुमचं अन्यायाच वागणं, माणुसकी शून्य व्यवहार करणं, गर्वानं मिरवणं, आम्हाला लाचारीनं गुलामासारख जगायला भाग पाडणं, त्याची खोटीनाटी समर्थनं करण हे सर्व आता फार झालं असं सांगून शेवटी अत्यंत आत्मविश्वासाने दमदारपणे कवी सांगतात.

"होते होते म्हणता म्हणता फारच झालं
लवकरच आमचा दिवस येतो आहे"[६२]
('लवकरच आमचा दिवस येतो आहे', पृष्ठ क्र. ६७)

नवीन समाजव्यवस्था निर्माण होण्याचा काळ अगदी समीप आला असल्याचा आशावाद कवी मांडतो आहे.

एक ना एक दिवस आम्ही यशस्वी होऊ तो दिवस फार लांब नाही. कारण आता आम्हाला आत्मशोधातून आपल्या हातांची ताकद कळाली आहे.

"खिशातले हात सहज वर केले
ते आकाशाच्या पार निघाले
..................................
आपले हात आकाशाला छेदतात
हे माहितच नव्हते"[६३]
('होऊ आंगभर', पृष्ठ क्र.५८)

आपले बळ समजल्यावर आणि एकजुटीने हे बळ वाढविल्यावर यश मिळण्यास कितीसा वेळ लागणार ? "एकंदरीत पर्यायी संस्कृतीचा विचार आणि वेळ कसे त्यात जगायला हवे याबद्दलची निश्चित भूमिका लोकनाथांची कविता मांडते. या संस्कृतीचे घटक कमजोर असतील तर त्या घटकांनी शरीरात लोखंड उतरवून घ्यावे. मजबूत व्हावे. दुनिया आपली आहे जोहाराचे सोंग घेऊन म्हणजे पारंपरिकतेची आतडी पारंपरिक अस्त्राने बाहेर काढावीत अशी विद्रोहाची नवी खेळी ही कविता मांडते"[६४] असे मत महेंद्र भवरे यांनी या काव्यसंग्रहाचे रसग्रहण करताना व्यक्त केले आहे.

## ३.६ कवी लोकनाथ यशवंत यांच्या भाषाशैलीची वैशिष्ट्य :

कवी लोकनाथ यशवंत हे तिसऱ्या पिढीचे प्रतिनिधित्व करणारे कवी आहेत. आंबेडकरी प्रेरणेतून लिहिणारे दलित कवी मनोरंजनापेक्षा सामाजिक बांधिलकीच्या जाणिवेने समाजपरिवर्तनासाठी लेखन करतात. म्हणून दलित कवी हा केवळ कवी नसून तो नेताही आहे. लोकनाथ यशवंत हे तिसऱ्या पिढीचे सामाजिक कार्यकर्ते आहेत. त्यांची कविता

म्हणजे दलित चळवळीचा बोलका इतिहास आहे. लोकनाथांची कविता मराठी काव्यप्रांतातील क्रांतीचा हुंकार देणारी कविता म्हणून तिची गणना केली जाते.

''लोकनाथ यशवंत यांची कविता वाचकांना तसेच रसिकांना अस्मितादर्श, निकाय, समुचित, पूर्वा, अनुष्टुभ, अक्षरवैदर्भी, तरुण-भारत, लोकप्रभा, नागपूर पत्रिका इत्यादी नियतकालिकांमधून सतत भेटत होती. नव्या दमाच्या या कवीची ओळख तशी जुनी आहे. शब्दात अंगार पेटवून हा कवी 'आता होऊन जाऊ द्या !' या कविता संग्रहाच्या निमित्ताने रसिकांपुढे सादर झाला आहे. लोकनाथची कविता अस्वस्थ करणारी, माणूसपण नाकारणाऱ्या समाजाला प्रश्न विचारणारी कविता आहे.''[६५] असे सुमिधा चव्हाण म्हणतात. त्यांची कविता अन्याय अत्याचाराच्या या इतिहासाला 'आता होऊन जाऊ द्या !' हे सणसणीत उत्तर आहे. लोकनाथ यशवंतची ही कतिवा काव्यात्मक वक्तृत्वशैलीचा गुण लाभलेली, व्यंगात्मक विधानं विधानं करीत जाणारी ती गद्यसदृश्य काव्य वाटते.

व्यवहारातील भाषेचा उपयोग सर्वच साहित्यिक कवीत असले तरीही प्रत्येक कवीचे स्वत:चे असे वेगळेपण असते. तिलाच आपण शैली असे म्हणतो. ''शैलीत भाषेत वापर निवड ह्या स्वाभाविक मानवी प्रवृत्तीनुसार केलेला आढळतो. भाषेत अनेक पर्याय उपलब्ध असताना विशिष्ट ध्वनी, शब्द, शब्दरचना, वाक्यरचना, व्याकरणविशेष किंवा वाक्य हेच लेखकाने 'का निवडले' ह्याचा शोध घेतला, तर निवड हा शैलीचा महत्त्वाचा धर्म आहे हे सिद्ध होते. जिथे अशी निवड नसते, तिथे भाषाशैलीचे अस्तित्व जाणवते.''[६६] लोकनाथांची कविता 'नफिसा' व 'भीमराव मेश्राम'ची कविता व्यवहार व तत्त्वज्ञान यातली तफात दाखवून देते. तरुण व संवेदनशील मनाच्या ह्या कविता सांस्कृतिक संघर्षाचे स्वरुप ते व्यक्त करतात.

आतापर्यंत आपण 'आता होऊन जाऊ द्या !' या काव्यसंग्रहातील कवितांचे आशयानुरुप वर्गीकरण करून कवितांचे विशेष कोणते आहेत हे पाहिले. दलित कवितेमध्ये सामाजिक जाणीव प्रकट करणाऱ्या कवितेमध्ये वेगळ्या गावकुसाबाहेरच्या समाजगटाच्या सामाजिक जाणिवा कशा प्रकट झाल्या आहेत हे अभ्यासले.

या सर्व विवेचनातून असे लक्षात येते की, 'आता होऊन जाऊ द्या !' मधील कवितांतून आलेले अनुभव हे प्रचलित दलित कवितेतील एकूण अनुभव विश्वापेक्षा वेगळे आहेत. समाजातील अनुभव कधी कधी विद्रोही स्वरुपात आविष्कृत झाले आहेत. हा कवी पारंपरिक सांस्कृतिविरूद्ध विद्रोह पुकारतो. मागच्या पिढीतील दलित कवितेमध्ये जो शिवराळपणा, भडकपणा, आक्रोश होता तो आजच्या दलित कवितेत नाही. दलित कवितेचं हे वेगळ वळण आहे.

कवी लोकनाथ यशवंत यांच्या कवितेमागे बुद्ध, फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्क्सवाद यांचे विचार अशा विविध प्रेरणा आहेत असे दिसते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार आणि कार्य हे यशवंताच्या वाङ्मयीन आणि वैचारिक भूमिकेचेही प्रेरणास्तोत्र आहे. म्हणूनच लोकनाथ यशवंतानी बाबासाहेबांचे विचार आणि कार्य दीन-दलितांच्या उद्धारासाठी कसे आहे, त्यांनी तयार केलेल्या व वापरलेल्या क्रांती शस्त्राचे मूलगामीत्व स्पष्ट केले आहे. हे क्रांतिशस्त्र मानवी हिताच्या आड येणाऱ्या व्यवस्थेच्या मुळावरच घाव घालून त्याला उखडून टाकणारे आहे.

फुले, आंबेडकरांची विचारप्रणाली स्वीकारुन कविता लेखन करणाऱ्या लोकनाथ यशवंतांच्या कवितेची प्रतिमासृष्टी बहुक्षेत्रीय नाविन्यपूर्ण आहे. कुटुंब, समाजव्यवस्था, परंपरा, धर्म, तत्त्वज्ञान, कृषी, विज्ञान समाजजीवन भोवतालचे विराह आणि भीषण वास्तव या सर्वांतून त्यांच्या कवितेची प्रतिमासृष्टी आकारास आली आहे. तसेच सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक आणि जगण्यातील नाना गोष्टींचा, व्यामिश्र अनुभवांचा नवा अर्थ ते प्रतिकांना देतात. लोकनाथांनी एकाचवेळी समाज, संस्कृती, राजकारण, धर्मकारण या गोष्टींची तत्त्वज्ञानाच्या पातळीवर परखड चिकित्सा केली आहे.

ही त्यांची सगळी कविता म्हणजे एका परिवर्तनासाठी, मानवमुक्तीसाठी झगडा करताना केलेला दीर्घ प्रवास आहे. म्हणूनच त्यांची कविता जशी महत्त्वाची सामाजिक कविता आहे तशीच ती राजकीय आणि क्रांती कविताही आहे. त्यांची कविता पहिल्या कवितासंग्रहापासून ते दुसऱ्या काव्यसंग्रहापर्यंत विकास पावत गेलेली कविता आहे.

एकाचवेळी तुकारामांच्या सर्वश्रेष्ठ कवितेशी नाते जोडणारी लोकनाथांची कविता, समकालीन आणि दलित कवितेहूनही चांगल्या अर्थाने पूर्वपरंपरेचा वारसा सहजसुलभपणे चालविते. व्यापक आणि व्यामिश्र जीवनदृष्टीचा प्रत्यय देते. एकूण मराठी कवितेत स्वत:चे वेगळे स्थान निर्माण करण्याचे सामर्थ्य असलेले कवी लोकनाथ यशवंत हे आशय, अभिव्यक्ती, भाषाशैली, प्रयोगशीलता आणि निश्चित वाङ्‌मयीन वैचारिक भूमिका घेऊन त्या भूमिकचा पाठपुरावा करण्यासाठी, सातत्याने लेखन करणारे स्वतंत्र बाण्याचे कवी आहेत. त्यांची कविता स्वतंत्र स्थान निर्माण करणारी श्रेष्ठ कविता आहे. त्यामुळे लोकनाथांची कविता समग्र कवितेत स्वतंत्र स्थान निर्माण करणारी श्रेष्ठ कविता आहे.

'आता होऊन जाऊ द्या !' या काव्यसंग्रहाच्या शीर्षकातूनच विद्रोह जाणवतो. त्यांच्या कवितेच्या अभिव्यक्तीचे वैशिष्ट्ये म्हणजे त्यांच्या काव्यसंग्रहाची व कवितेची शीर्षके बोलकी व अर्थपूर्ण वाटतात. दलित कविता ही प्रामुख्याने मुक्त छंदातून आविष्कृत झाली आहे. कवी लोकनाथ यशवंतानी प्रस्थापितांच्या पारंपरिक अभिजात साहित्याला हादरा देऊन दलित साहित्यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे क्रांतीकारी विचार व बौद्धधर्मातील पुरोगामी विचार कवितेत मांडून मोठीच क्रांती घडविली आहे.

लोकनाथांची कविता शब्दात अंगार घेऊन समोर येते. तिच्यामध्ये दाहकता आहे तशीच अश्रूंची शीतलता आहे. सामाजिक अन्यायाबद्दल कवीने चीड व्यक्त केली आहे. सातत्याने संघर्षाचे बोल बोलणारी 'आता होऊन जाऊ द्या !' मधील कविता आहे. 'बुद्ध-फुले-आंबेडकरी' विचारांना जन सामान्यात रुजवून त्यांच्या हक्काची जाणीव करून देणे व स्वत:च्या 'निसर्गदत्त अस्मितेसाठी' बुलंद लढा उभारणे हे लोकनाथांच्या कवितेचे वैशिष्ट्य आहे. याच कलात्मक गुणांमुळे, घटनात्मक हक्कामुळे लोकनाथांची कविता सर्वसामान्य माणसांच्या वेदनेंचा हुंकार बनली आहे.

'आता होऊन जाऊ द्या !' मधील कवितातून पारंपरिक मूल्यांना छेदून आणि भेदून लोकनाथांनी प्रस्थापित मूल्यांची कोंडी फोडली. प्रयोगक्षमता, स्वच्छंदीपणा आणि संघर्ष ही या काव्यसंग्रहाची वैशिष्ट्ये आहेत. लोकनाथांची भाषा संवाद साधणारी आहे.

उदा. 'भिमराव मेश्रामाची कविता', 'अतिक्रमणे', 'नव्या शहराविषयी', 'असउदल्लाखाँ उर्फ 'मिर्झा गलिब' ! ह्या कविता बोलक्या आहेत. 'आता होऊन जाऊ द्या' हा काव्यसंग्रह वाचताना बऱ्याचदा स्वत:ला विसरुन जावं लागेल. प्रत्येक कवितेतून लोकनाथांनी प्रश्नांचे तांडव उभे केलेत. त्यांच्या कवितेची चिंतनशैली त्यांना तिसऱ्या पिढीत नेऊन बसविते. 'गालिब' या कवितेत त्यांनी आपल्या प्रतिभेचा फुलोरा फुलविला आहे. त्यांच्या कवितेची शीर्षके साधी, सरळ, सुटसुटीत पण नेमकेपणाने टिपणारी आहेत. या शीर्षकामधून डोकाविणारा आशय, विषय प्रत्येक ओळीतून फु लतफुलत आपल्याला एका विशिष्ट वातावरणात नेते.

त्यांची कविता बिभत्स व अश्लीलतेला बगली मारुन संस्कृतीशी झुंजणारी सामान्य कार्यकर्त्याची कविता होय. यात गद्य आणि लालित्य यांचा सुरेख संगम आहे. कविता व्यंगात्मक आहे. आगतिकता, लाचारी नाकारणे हे या काव्यसंग्रहाचे वैशिष्ट्य आहे. लोकनाथांची कविता म्हणजे स्वच्छंदी फळ आहे.

कवीने आपल्याच समाजातल्या वांशिक नेतृत्वावर टीका करतांना मागे-पुढे बघितले नाही. पुढाऱ्यांनीच स्वत:चा समाज अनाथ केला आहे असे ते स्पष्टच म्हणतात. आपल्याच समाजातल्या दांभिक नेतृत्वावर टीका करताना मागे पुढे बघत नाहीत. पुढाऱ्यांनीच स्वत:ची अनाथ केलेली समाज व्यवस्था, एकेकाच्या प्रखर आंदोलनाला बोथट करण्यात यशस्वी झालेली व्यवस्था समाजातला सुशिक्षित वर्ग प्राप्त लाभात स्वत:ला हरवून बसलेला आहे. अशा प्रकारे सर्व अंगानी कोंडल्या गेलेल्या अवस्थेत हतबल झालेल्या सर्व सामान्यांच्या व्यथा-क्रोधाचे प्रतिनिधित्व लोकनाथांची कविता करते.

बाबासाहेबांच्या मृत्यूनंतर त्यांच्या स्वयंघोषित वारसदारांनी त्यांच्या विचारांना लोकादराचा लेप देऊन जागीच गोठवून टाकले. परिस्थितीनुरुप कुणी काही नवीन सांगितले तर तो बाबासाहेबांच्या विचारांती द्रोह आहे, असे जाहीर करून नवागताची गळचेपी करण्यात हे मठाधिश यशस्वी झाले आहेत. लोकनाथांच्या कवितांचे वैशिष्ट्य हे की त्यात ही चूक मान्य करणारे कठोर आत्मपरीक्षण आहे.

इतिहासाच्या पार्श्वभूमीवर समकालीन जीवनाचा आविष्कार करणे, आत्मशोध घेणे हे लोकनाथ यशवंत यांच्या कवितेचे वेगळेपण आहे. उत्स्फूर्त संभाषणाची स्वाभाविक लय, सुबोध अनलंकृत भाषा, उपरोध, आत्मपरीक्षण आणि अल्पाक्षरत्व हे त्याच्या कवितेचे खास वैशिष्ट्य म्हणावे लागेल. कवी लोकनाथ यांची कविता प्रामुख्याने सामाजिक विषमतेचे चित्रण करणारी आहे. या देशातील प्रस्थापित समाजव्यवस्थेतील देश,देव, संस्कृती, धर्मग्रंथ इत्यादी गोष्टींना लोकनाथ यशवंतानी विरोध केलेला दिसतो. त्यांच्या कवितेतून बुद्ध, फुले, आंबेडकर, मार्क्स इत्यादींच्या विचारांचा प्रभाव जाणवतो.

लोकनाथ यशवंताच्या कवितेतील प्रतिमा अतिशय सूचक आहेत. उदा. 'वाहता वारा', 'आली आंदोलन' गावात पोहचवितो, 'आक्रोशाचा भडका' होता वाहता वारा अदृष्य असतो तरीही गावात आंदोलन पोहचविण्याचे सामर्थ्य त्यांच्यात असते. दलित चळवळीचे प्रतिबिंब ही त्यांच्या कवितेत दिसते. प्रतिमा आणि प्रतिकाचा वापर करून संस्कृतीची रुपे या कवितेने साकार केली आहेत. 'लवकरच आमचा दिवस येतो आहे' असा आशावाद व्यक्त करणारी कवी लोकनाथ यांची कविता आहे.

लोकनाथांनी सामाजिक बांधिलकीच्या शोकात्म कथा अत्यंत तटस्थपणे आणि प्रामाणिकपणे सांगितल्या आहेत. वाचकांना विद्रोहाचे आव्हान करतांना स्वत:ची भूमिका स्पष्टपणे मांडली आहे हे करतानाच लोकांना सामाजिक भान देण्याचा जो प्रयत्न कवीने केला आहे तो अत्यंत स्तुत्य आहे. लोकनाथांची कविता कधी विद्रोही रुपाने तर कधी शांत, संयमी वृत्तीने अनुभव मांडते. तिच्यातील वास्तवता आणि यातनांची धग जाणवतेय. त्यांच्या कवितेची शैली साधी असल्यामुळे तिच्यात दुर्बोधता नाही. तिचे स्वरुप विधानासारखे आहे. त्यात शब्दांना आणि शब्दांच्या ध्वनीना महत्त्व आहे. आंतरिक लय आहे. अनेक कवितातून आपल्या बांधवांना किंवा स्पृशांना आव्हान केले आहे. अशावेळी कवीचा राग, संताप व्यक्त करणारे बोचरे शब्द आलेले आहेत.

कवी आपल्या काव्याला आणि त्यातील शब्दांना शस्त्र म्हणूनच वापरत असल्याने निर्णायक स्वरुपाचे आव्हान 'आता होऊन जाऊ द्या !' या शीर्षकाप्रमाणे सर्वत्रच आले आहे.

कवितेची शैली साधीच असली तरी अनेकार्थ सूचकता हे तिचे मोठेच सामर्थ्य आहे. उदा. 'पाया', 'कुपी', 'मोर्चा', 'नाही असे नाही' इत्यादी कवितातून आलेले संघर्षाचे आव्हान वेधक आहे. कवीने वापरलेली प्रतीके ही सुंदर आहेत. 'कोंडवाडा' हा शब्द प्रस्थापित समाजव्यवस्थेतील माणुसकीची गळचेपी करणारी करकचून आवळणारी स्थिती याचे प्रतिक बनून आला आहे. तसेच 'मुसळधार पाऊस' हा झोडपण्याचे प्रतिक म्हणून आला आहे. 'मोर्च्यातील घोषणा' या खतवाहिन्याचे प्रतिक बनल्या आहेत.

लोकनाथांची कविता आत्मशोध घेते म्हणजेच आपल्याच कवितेतून स्वत:चा शोध घेता घेता समाजमनाच्या प्रवृत्तीचाही ती शोध घेणे कवीचे आत्मभान जागृत असल्याचा प्रत्यय ही कविता देते. 'आता होऊन जाऊ द्या !' हे नांव अतिशय समर्पक असून प्रत्येकाने वाचावा असा चिंतनशील काव्यसंग्रह आहे. लोकनाथाची कविता शासक नि शोषक व्यवस्थेला सावधगिरीचा इशारा देतानाच नैतिकतेचा पुरस्कार करते. अशा प्रकारची आशावादी कविता सद्य:स्थितीतील सामाजिक झंझावातात पारदर्शी ठरू शकते यात शंका नाही.

## ३.७ निष्कर्ष :

१) 'आता होऊन जाऊ द्या !' हा त्यांचा दलित कवितांचा संग्रह हा सहा सन्मानांनी पुरस्कारीत झालेला संग्रह आहे.

२) या काव्यसंग्रहाचे इंग्रजी आणि उर्दू भाषेत अनुवादही झाले आहेत.

३) 'आता होऊन जाऊ द्या !' या संग्रहातील कविता आत्मपिडेतून आणि आत्मशोधातून जन्मलेली आहे.

४) कवीला सामाजिक परिवर्तनाची आस असल्यामुळे त्यातील अनेक कवितातून सामाजिक वास्तवाच्या पार्श्वभूमीवर समाजाला आत्मभान देणेच आत्मभानाची जागृती देण्याचा प्रयत्न कवीने अनेक कवितातून केला आहे. 'लेप्रसी', 'कथा', 'भीमराव मेश्रामची कविता', 'मोर्चा', 'एक शून्य आणखी' इत्यादी कविता त्यांच्या द्योतक आहेत.

५) लोकनाथ यशवंताना सामाजिक वास्तवात मूलतत्ववादी प्रवृत्तीचे कावेबाजरुप पाहावयास मिळाले त्याचेही अत्यंत प्रभावी आणि वास्तव चित्र त्यानी 'लेप्रसी', 'जागृती', 'भीमराव मेश्रामची कविता', 'प्रतिनिधी', 'तुझे विचार माझे आहेत' इत्यादी कवितातून रेखाटले आहे.

६) समाजाला आत्मभान देऊन वर्णव्यवस्थेचे कावेबाजरुप दाखवून त्याला विरोध करण्याचे आवाहन केले आहे.

७) कवीने वापरलेली प्रतीके ही सुंदर आहेत. 'कोंडवाडा' हा शब्द प्रस्थापित समाजव्यवस्थेतील माणुसकीची गळचेपी करणारी करकचून आवळणारी स्थिती याचे प्रतिक बनून आला आहे.

८) प्रस्तुत काव्यसंग्रहातील काही कविता आत्मनिवेदनपर असून त्यातील मी समष्टीरुपच आहे. समाजमनाचाच एक भाग त्यातून व्यक्त झालेला दिसतो. आपण भ्यालो तर ते सतत आपल्याला भीतीच दाखवतील तेव्हा उगारलेल्या काठीला न भिता त्या काठीवरच वार केला पाहिजे असे कवी सांगतो. अर्थात हल्ला करताना, समाजाविरूद्ध न्याय हक्कासाठी लढताना हातातले शस्त्र केव्हाही कसे वापरुन चालणार नाही हे आवर्जुन ध्यानात घ्यावे असेकवीने 'शस्त्रांच्या कवितेत' स्पष्ट केले आहे.

९) प्रस्थापित व्यवस्थेला आव्हान करताना एकसुसंगत विचार आणि तत्त्वज्ञान कवीने मनापाशी बाळगले आहे याचा प्रत्यय येतो.

१०) स्वसामर्थ्याची जाणीव घेऊन, लढण्यास सिद्ध व्हावे हे कवींनी 'एक शून्य आणखी', 'बोट', 'आरंभ', 'दंडवत', 'कुपाच्या बाहेर', 'युद्ध' इत्यादी कवितांतून सांगितले आहे.

११) कवी लोकनाथ यशवंत समाजाला रुढ व्यवस्थेविरूद्ध लढण्याचे आव्हान करतात. त्यामागे त्यांचे चिंतन आहे. आंबेडकरी तत्त्वज्ञानाचा, मार्क्सवादी तत्त्वज्ञानाचा, बुद्धतत्त्वज्ञानाचा सांगोपांग अभ्यास आहे. त्या संदर्भाचे अनेक संदर्भ त्यांच्या

कवितेतून येतात.  कवीला केवळ विध्वंस करावासा वाटत नाही. म्हणूनच आपल्या बंडखोरीतून नवी पर्यायी संस्कृती आपण निश्चित उभारु शकू असा आशावाद कवीने व्यक्त केला आहे.

१२) आशिर्वादावर भरोसा ठेवण्याऐवजी प्रयत्नाच्या जोरावर नवा ललाट लेख लिहिला पाहिजे असे कवी सांगतात. 'दंडवत', 'पलायन', 'गृहयुद्ध', 'होऊ द्या अंगभर', 'शस्त्राच्या कविता' अशा कितीतरी कवितातून कवीने सावधानतेचा इशारा देत आक्रमक होण्याचे आव्हान केले आहे.

१३) कवी लोकनाथांच्या या सर्वच कवितांना तत्त्वज्ञानाच्या चिंतन मननाचे आधिष्ठान लाभलेले आहे. त्यामुळेच त्यात आलंकारिक भाषा नाही सर्व सुस्पष्ट रोखठोक मांडणी आहे. यामुळे यातील भाषेला एक प्रकारचा जोरकसपणा आलेला आहे. माणुसकीचे मूल्य आणि समानतेचे तत्त्व असलेचे तीव्रपणे जाणवते.  त्यामुळेच तलवारीची भाषा नुसतीच विध्वंसक वाटत नाही. तर विधायक कार्याची जाणीव आणि प्रेरणाही त्यातून व्यक्त होताना दिसते.

१४) कवी लोकनाथ यशवंत हे तिसऱ्या पिढीतील एक क्रांतिकारी कवी आहेत.

-----

## संदर्भ सूची


१) भवरे महेंद्र, : 'दलित कवितेतील नवे प्रवाह', शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, प्रथम आवृत्ती, २००१, पृष्ठ क्र. १०४.

२) यशवंत लोकनाथ, : 'आता होऊन जाऊ द्या !', 'लेप्रसी', मुक्तछंद प्रकाशन, नागपूर-२७, द्वितीय आवृत्ती, २००३, पृष्ठ क्र.२२.

३) तत्रैव, : 'जागृती', पृष्ठ क्र. १९.

४) तत्रैव, : 'भीमराव मेश्रामची कविता', पृष्ठ क्र.७०.

५) तत्रैव, : 'प्रतिनिधी', पृष्ठ क्र. २१.

६) तत्रैव, : 'दहशत', पृष्ठ क्र.२६.

७) तत्रैव, : 'तुझे विचार माझे आहेत', पृष्ठ क्र. ६६.

८) तत्रैव, : 'एका मोर्चाचा शेवट', पृष्ठ क्र. ३४.

९) भवरे महेंद्र, : 'दलित कवितेतील नवे प्रवाह', शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, प्रथम आवृत्ती, २००१, पृष्ठ क्र.१०४.

१०) यशवंत लोकनाथ, : 'आता होऊन जाऊ द्या !', 'डॉ. भीमराव रामजी आंबेडकर उर्फ बाबासाहेब', मुक्तछंद प्रकाशन, नागपूर-२७, द्वितीय आवृत्ती, २००३, पृष्ठ क्र.२३.

११) तत्रैव, : 'एक शून्य आणखी', पृष्ठ क्र. १७.

१२) तत्रैव, : 'आरंभ', पृष्ठ क्र. २०.

१३) तत्रैव, : 'दंडवत', पृष्ठ क्र. ५७.

१४) चव्हाण समिधा, : 'आता होऊन जाऊ द्या !', अक्षरवैदर्भी, एप्रिल/मे, १९९१, पृष्ठ क्र. ५१, ५२.

१५) यशवंत लोकनाथ, : 'आता होऊन जाऊ द्या !', 'कुपाच्या बाहेर', मुक्तछंद प्रकाशन, नागपूर-२७, द्वितीय आवृत्ती, २००३, पृष्ठ क्र.५६.

१६) तत्रैव, : 'मुठी', पृष्ठ क्र. ६४.

१७) तत्रैव, : 'मार्क्सवादी', पृष्ठ क्र. ७२.

१८) तत्रैव, : 'उभे राहण्याची कविता', पृष्ठ क्र. ३९.

१९) तत्रैव, : 'कथा', पृष्ठ क्र. ५२, ५३.

२०) लहाने इंदूमती, : 'दलित कवितेला नवे वळण', 'आता होऊन जाऊ द्या !', समीक्षा लेख, (लोकनाथ यशवंत यांनी पाठविलेली सत्यप्रत कात्रण).

२१) भोईर भगवान : 'माणुसकीच्या प्राप्तीसाठी केलेल्या युद्धाची गाथा', महाराष्ट्र साहित्य पत्रिका, जानेवारी-मार्च, १९९०, पृष्ठ क्र. ११२.

२२) यशवंत लोकनाथ, : 'आता होऊन जाऊ द्या !', 'शस्त्राच्या कविता', मुक्तछंद प्रकाशन, नागपूर-२७, द्वितीय आवृत्ती, २००३, पृष्ठ क्र. २४.

२३) तत्रैव, : 'दोन कामगारांच्या गोष्टी', पृष्ठ क्र. ३५.

२४) तत्रैव, : 'नाही असे नाही !', पृष्ठ क्र. ६०.

२५) तत्रैव, : 'गाढवांच्या कविता', पृष्ठ क्र. ५०.

२६) तत्रैव, : तत्रैव, पृष्ठ क्र. ५०.

२७) तत्रैव, : 'डोळे', पृष्ठ क्र. ५१.

२८) तत्रैव, : 'नव्या शहराविषयी', पृष्ठ क्र.५५.

२९) तत्रैव, : 'कांगावा', पृष्ठ क्र.६८.

३०) तत्रैव, : 'क्रान्ती', पृष्ठ क्र. ३६.

३१) तत्रैव, : 'काटे नसलेले घड्याळ । दोन मतं',पृष्ठ क्र.५४.

३२) तत्रैव, : 'आरंभ', पृष्ठ क्र.२०.

३३) तत्रैव, : तत्रैव, पृष्ठ क्र.२०.

३४) तत्रैव, : 'शस्त्राच्या कविता', पृष्ठ क्र.२४.

३५) तत्रैव, : 'कांजी', पृष्ठ क्र. २७.

३६) तत्रैव, : 'तत्रैव', पृष्ठ क्र.२७.

३७) तत्रैव, : 'बंद खोलीचे प्रकाशणारे कोपरे', पृष्ठ क्र.२९.

३८) तत्रैव, : 'नफिसा', पृष्ठ क्र.३१.

३९) तत्रैव, : 'तत्रैव', पृष्ठ क्र.३१.

४०) तत्रैव, : 'माझी माणसं', पृष्ठ क्र.३२.

४१) तत्रैव, : 'कथा', पृष्ठ क्र.५३.

४२) तत्रैव, : 'मुठी', पृष्ठ क्र.६४.

४३) तत्रैव, : 'मोर्चा', पृष्ठ क्र.४२.

४४) लिंबाळे शरणकुमार : 'साहित्याचे निकष बदलावे लागतील', दिलीपराज प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती २००५, पृष्ठ क्र.२५.

४५) यशवंत लोकनाथ : 'आता होऊन जाऊ द्या !', 'मी जबाबदार नाही', मुक्तछंद प्रकाशन, नागपूर-२७, द्वितीय आवृत्ती, २००३, पृष्ठ क्र.६५.

४६) तत्रैव, : 'काहीतरी झालेच पाहिजे', पृष्ठ क्र.२८.

४७) लिंबाळे शरणकुमार : 'साहित्याचे निकष बदलावे लागतील', दिलीपराज प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, २००५, पृष्ठ क्र.२४.

४८) यशवंत लोकनाथ : 'आता होऊन जाऊ द्या !', 'अतिक्रमण', मुक्तछंद प्रकाशन, नागपूर-२७, द्वितीय आवृत्ती, २००३, पृष्ठ क्र.४६.

४९) तत्रैव, : 'गझल', पृष्ठ क्र.३८.

५०) तत्रैव, : 'गृहयुद्ध', पृष्ठ क्र. ४५.

५१) लिंबाळे शरणकुमार : 'साहित्याचे निकष बदलावे लागतील', दिलीपराज प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, २००५, पृष्ठ क्र.२२.

५२) यशवंत लोकनाथ : 'आता होऊन जाऊ द्या !', 'कुपाच्या बाहेर', मुक्तछंद प्रकाशन, नागपूर-२७, द्वितीय आवृत्ती, २००३, पृष्ठ क्र.५६.

५३) तत्रैव, : 'युद्ध', पृष्ठ क्र.४३.

५४) तत्रैव, : 'छोट्याशा बिंदूत मोठाली स्वप्न', पृष्ठ क्र.४७.

५५) तत्रैव, : 'वाक्य, पृष्ठ क्र. ६१.

५६) भवरे महेंद्र, : 'दलित कवितेतील नवे प्रवाह', शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, प्रथम आवृत्ती, २००१, पृष्ठ क्र.११०.

५७) यशवंत लोकनाथ : 'आता होऊन जाऊ द्या !', 'पाया', मुक्तछंद प्रकाशन, नागपूर-२७, द्वितीय आवृत्ती, २००३, पृष्ठ क्र. ६३.

५८) तत्रैव, : 'शस्त्राच्या कविता', पृष्ठ क्र.२५.

५९) तत्रैव, : 'दंडवत', पृष्ठ क्र. ५७.

६०) तत्रैव, : तत्रैव, पृष्ठ क्र. ५७.

६१) तत्रैव, : 'पलायन', पृष्ठ क्र. ४१.

६२) तत्रैव, : 'लवकरच आमचा दिवस येतो आहे', पृष्ठ क्र.६७.

६३) तत्रैव, : 'होऊ द्या आंगभर', पृष्ठ क्र.५८.

६४) भवरे महेंद्र : 'दलित कवितेतील नवे प्रवाह', शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, प्रथम आवृत्ती, २००१, पृष्ठ क्र.११२.

६५) चव्हाण समिधा : 'आता होऊन जाऊ द्या ! ', 'अक्षरवैदर्भी', एप्रिल/मे, १९९१, पृष्ठ क्र.४९.

६६) नेमाडे भालचंद्र : 'साहित्याची भाषा', साकेत प्रकाशन, औरंगाबाद, द्वितीय आवृत्ती, १९९८, पृष्ठ क्र. ४२.


-----